सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित

श्रीमती. मणिबेन. एम. पी शाह कला आणि वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालय, माटुंगा

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

## नव चैतन्य

वर्ष चौथे, अंक ४

मे २०२६

# संपादकीय

आदरणीय वाचकवर्ग, प्रिय विद्यार्थिनींनो, आणि मान्यवर प्राध्यापकवृंद, आपल्या महाविद्यालयातील मराठी विभागाच्या 'पालवी ई-नियतकालिके'च्या या चौथ्या वर्षातील नव्या अंकाचे प्रकाशन करताना मला अतिशय आनंद होत आहे. ज्ञान, संवेदना आणि सृजनशीलतेचा संगम असलेल्या या 'पालवी ई-नियतकालिके'ने अल्पावधीतच आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. गेल्या चार वर्षांत या उपक्रमाने विद्यार्थिनींच्या साहित्यिक अभिव्यक्तीला केवळ व्यासपीठच दिले नाही, तर त्यांच्या विचारविश्वाला समृद्ध करण्याचे कार्यही प्रभावीपणे केले आहे.

आजच्या तंत्रज्ञानप्रधान युगात ई-मासिक ही केवळ एक आधुनिक संकल्पना नसून ती ज्ञानविनिमयाची, संवादाची आणि सर्जनशीलतेची एक प्रभावी माध्यमव्यवस्था आहे. या माध्यमातून विद्यार्थिनींना आपले विचार, भावना, अनुभव आणि कल्पना मोकळेपणाने व्यक्त करण्याची संधी मिळते. मराठी भाषेची गोडी, तिचे वैभव आणि तिची अभिव्यक्ती यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतो.

या अंकातील लेखन वाचताना विद्यार्थिनींच्या विचारांची परिपक्वता, त्यांच्या भावविश्वाची खोली आणि सामाजिक जाणीव यांचा प्रत्यय येतो. 'व्यथा स्त्री जन्माची' या कवितेतून स्त्रीच्या वेदना, संघर्ष आणि समाजातील दुहेरी निकष यांचे अत्यंत प्रभावी चित्रण केलेले दिसते. स्त्री ही केवळ नात्यांच्या चौकटीत बांधलेली नसून तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे, हा ठाम संदेश या लेखनातून व्यक्त होतो. तसेच 'नारी अस्मिता' या लेखात स्त्रीशक्तीचे सामर्थ्य, तिचे व्यक्तिमत्त्व आणि समाजातील तिची भूमिका यांचे प्रेरणादायी दर्शन घडते. विद्यार्थिनींच्या वैयक्तिक अनुभवांना शब्दबद्ध करणारे लेख देखील या अंकाचे वैशिष्ट्य आहेत. 'माझा अविस्मरणीय क्षण' आणि 'आंतरवासितेतील पहिला अनुभव' यांसारख्या लेखांमधून आत्मविश्वास, भीतीवर मात करण्याची जिद्द आणि नव्या अनुभवांतून होणारी स्वतःची ओळख यांचे अत्यंत सुंदर चित्रण केले आहे.

निसर्गाशी नाते सांगणारा 'मेघांच्या सरींतील आनंद' हा लेख पावसाळ्याच्या रम्य अनुभूतींना शब्दांत रंगवतो. कौटुंबिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करणारा 'बाबा – आयुष्याचे शिल्पकार' हा लेख वाचताना वडिलांच्या प्रेमाचा, त्यागाचा आणि मार्गदर्शनाचा प्रत्यय येतो. तसेच 'बालपणातील खेळ आणि कथा' व 'हरवलेली मराठी शाळा' या लेखांमधून आपल्या परंपरांचे, संस्कारांचे आणि मातृभाषेच्या शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. कविता, कथा, अनुभव, चिंतन आणि सामाजिक प्रश्न यांचा समतोल साधणारा हा अंक विद्यार्थिनींच्या सर्वांगीण विकासाचे प्रतीक आहे. विशेष म्हणजे, या लेखनातून केवळ वैयक्तिक भावनाच नव्हे तर सामाजिक वास्तव, स्त्री-सशक्तीकरण, शिक्षणाचे महत्त्व आणि संस्कारांची जपणूक यांसारख्या विषयांवरही सखोल विचार मांडले गेले आहेत.

या ई-मासिकाच्या यशामागे मराठी विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन, विद्यार्थिनींचा उत्साह आणि संपादकीय समितीचे परिश्रम यांचा मोठा वाटा आहे. या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळेच हा उपक्रम आज चौथ्या वर्षात यशस्वीपणे पदार्पण करत आहे.



**डॉ. अर्चना पत्की**
**प्राचार्य**

मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक

# पालवी

नव चैतन्य

## संपादकीय मंडळ

डॉ. अर्चना पत्की

डॉ. रश्मी शेटये-तुपे

प्रा. माधवी पवार

कु.मनाली मणचेकर

कु. अश्विनी चव्हाण

कु. स्नेहा अडसूळ

कु. रिया ठुकरूल

कु. रितुजा ढवळे

कु. सानिका पादड

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | विषय | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | व्यथा स्त्री जन्माची – गीतांजली मोहन पोळ | १ |
| २ | मेघांच्या सरींतील आनंद – मानसी सतीश शिंदे | ३ |
| ३ | एकतर्फी चाफा – स्नेहा अडसूळ | ५ |
| ४ | बाबा – आयुष्याचे शिल्पकार – संस्कृती विलास गंधट | ६ |
| ५ | नारी अस्मिता – अर्चना अशोक कदर | ८ |
| ६ | आंतरवासितेतील पहिला अविस्मरणीय क्षण – पूजा गौतम बागडे | १० |
| ७ | माझे भविष्यातील स्वतः ला पत्र – समीरा अनंत रेडक | १२ |
| ८ | बालपणातील खेळ आणि कथा– संध्या गायकवाड | १५ |
| ९ | शेतकऱ्याची व्यथा – करिना गावडे | १७ |
| १० | माझा अविस्मरणीय क्षण – सानिका पादड | १८ |
| ११ | खरा मित्र – अश्विनी चव्हा | २० |
| १२ | हरवलेली मराठी शाळा व बालपण – ममता गाकवाड | २१ |
| १३ | शारदोत्सव व्याख्यानमाला २०२५ | २५ |
| १४ | मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६ | ४९ |

# व्यथा स्त्री जन्माची

जन्मताच मानतात
परक्याच धन,
कधी कोणी जाणलय
का हो तिचं मन ?

तुम्हाला वाटलं म्हणून
गर्भातच तिला चिरडलं,
तुमच्या सोयीप्रमाने
'बेटी बचाव बेटी बढ़ाव'
हे अभियान तुम्ही राबवलं

पाटची बहीण पोटची
मुलगी नाही कळलं नातं,
जी माऊली जन्मदात्री
तिचं मन ही तिला खातं

ऐकीकडे लक्ष्मी मानता
दुसरीकडे तिला बाजारात
विकता अन् विकत घेता
तुमच्या वासनेची भूक
मिटावी म्हणून तिचाच
का बळी घेता ?

रुपवान असून सुद्धा
सौंदर्याचा शाप,
करतोय तिच्याच
आयुष्याचा घात.

तिने बाहेर काम केलं तर,
तिच्या चारित्र्यावर शिंतोडे
उडवता, घरात राहिली तर
आयतं गिळते असही म्हणता.



# व्यथा स्त्री जन्माची

ज्या नात्यांनी परिस्थितीची
मर्यादा तिला घातली,
तिच्या यशाच्या भरारीत
सुद्धा आपण तिलाच टोकली.

शरीर सोडून कधीतरी बघा
माणूस म्हणून कधीतरी जगा
दिसेल निरागसता तुम्हाला
तिच्यामध्ये माणूस
म्हणून तिच्याशी वागा

'ती' आई,बहीण,बायको
कुटुंबाची त्याही आधी
ती एक 'स्त्री' आहे,
कारण प्रत्येक यशामागे
तिचं एक प्रेरणा आहे.
हे विसरू नका आता कोणी
हे विसरू नका आता कोणी

**कु. गीतांजली मोहन पोळ**
द्वितीय वर्ष कला शाखा.



# मेघांच्या सरींतील आनंद

प्रत्येक व्यक्तीचा कोणता ना कोणता तरी एखादा आवडता ऋतू असतो आणि आपले मन त्यात आनंद शोधते यातून मिळणाऱ्या आनंदानेच आपल्याला ताजेतवाने वाटते. असाच माझाही एक आवडता ऋतू म्हणजे वर्षा ऋतू. पावसाळा हा निसर्गाचा सर्वात सुंदर आणि आनंददायी ऋतू मानला जातो. उन्हाळ्याच्या तडाख्यानंतर जेव्हा आकाशात काळेभोर मेघ दाटून येतात, तेव्हा मनात एक वेगळाच उत्साह संचारतो. मेघांच्या सरींनी धरतीला जणू नवसंजीवनी मिळते आणि सर्वत्र हिरवाईचे साम्राज्य पसरते. पहिल्या पावसाच्या सरींनी मातीचा सुगंध दरवळतो, जो प्रत्येकाच्या मनाला आनंद देतो. झाडे, वनस्पती नव्या जोमाने डोलू लागतात. शेतकरी तर पावसाच्या आगमनाची आतुरतेने वाट पाहत असतो, कारण त्याच्या शेतीचे जीवन पावसावर अवलंबून असते. मेघांच्या सरींनी त्याच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटते. लहान मुलांसाठी पाऊस म्हणजे खेळण्याचा सणच असतो. पावसात भिजणे, कागदी होड्या पाण्यात सोडणे, चिखलात खेळणे या सर्व गोष्टींमुळे त्यांचा आनंद द्विगुणित होतो. मोठ्यांनाही पावसाळा आवडतो; गरम चहाचा कप आणि खिडकीतून पडणाऱ्या सरींचे दर्शन हा एक वेगळाच अनुभव असतो.



# मेघांच्या सरींतील आनंद

मेघांच्या सरींमुळे नद्या, तलाव भरून वाहू लागतात. धरणे पाण्याने भरतात, ज्यामुळे पुढील काळात पाणीटंचाई कमी होते. निसर्गात सर्वत्र एक ताजेपणा आणि प्रसन्नता निर्माण होते. तथापि, अतिवृष्टीमुळे कधी कधी पूरस्थिती निर्माण होते, ज्यामुळे जनजीवन विस्कळीत होते. रस्त्यावर पाणी साचल्यामुळे वाहतूक विस्कळीत होते आणि वेगवेगळ्या आजारांचा परिणाम आपल्या शरीरावर होतो त्यामुळे या ऋतूत आरोग्याची काळजी घेणे हे तितकेच महत्त्वाचे असते. त्यामुळे पावसाचा आनंद घेताना त्याचे परिणामही लक्षात घेणे आवश्यक आहे. एकूणच, मेघांच्या सरींमध्ये एक अनोखा आनंद दडलेला आहे. त्या सरी केवळ निसर्गालाच नव्हे, तर आपल्या मनालाही ताजेतवाने करतात. पाऊस म्हणजे जीवन, उत्साह आणि नव्या सुरुवातींचे प्रतीक आहे.पावसाच्या सरी कधी रिमझिम, तर कधी मुसळधार कोसळतात. त्या सरी जणू जीवनातील भावनांसारख्या कधी हलक्या, कधी तीव्र. पण प्रत्येक सरी मनाला काहीतरी शिकवून जाते सोडून देणं, वाहत राहणं, आणि प्रत्येक क्षणाचा आनंद घेणं.
मेघांच्या या सरींमध्ये केवळ पाणी नसतं, तर त्यात असते नव्या आशांची चाहूल, नव्या स्वप्नांची सुरुवात. त्या सरींनी मनातील कोरडेपणा दूर होतो आणि अंतर्मनातही एक हिरवळ फुलते.म्हणूनच, मेघांच्या सरी म्हणजे फक्त पाऊस नव्हे तो एक अनुभव आहे, एक भावना आहे, आणि जीवनाला नव्याने उमलवणारा एक सुंदर स्पर्श आहे.

**कु.मानसी सतीश शिंदे**
प्रथम वर्ष वाणिज्य शाखा



# एकतर्फी चाफा

गुलाब आणि मोगऱ्याच्या
भांडणात चाफा हुळूवार हसला
तो हक्काच्या भानगडीत
मात्र कधीच नाही फसला

त्याला माहीत होत ती
त्याला मिळणार नाही
तरीही एक गुलाब देऊन
त्याने कधी तिला ते सांगितलं नाही

त्याने सांगितलं नाही म्हणून
तिने ही कधी विचार केला नाही
गुंतली ती दुसऱ्या गुलाबात
पण तो मोगरा झाला नाही

मोगरा होता दुसरा कोणी
हे चाफ्याला कळलं
पण मोगऱ्याचा गंधात
तिनं चाफ्याला टाळलं

गुलाबाचे काटे गळून पडले
मोगऱ्याचा रुबाब बघून
सगळं बघत बसला चाफा
गप्प मुख गिळून!!

म्हणूनच तर त्याने कधी
हक्क नाही बजावला
केली मदद गुलाबाला
काट्याची जाणीव करुन द्यायला

आतून जळाला गुलाब
तरी बाजूला चाफा बघत राहिला
राख झाली गुलाबाची तरी
चाफ्याने त्या राखेला ही सुगंध दिला

**कु. स्नेहा अडसूळ**
द्वितीय वर्ष कला शाखा



# बाबा - आयुष्याचे शिल्पकार

बाबा म्हणजे प्रेमरूपी सावली
उन्हातही सुखावणारी शीतलतेची माऊली
शब्दांत न मावणारी अगाध त्यांची माया
काबाडकष्ट करुनी कुटुंबास देई छाया

प्रत्येकाच्या आयुष्यात आई-वडिलांचे स्थान अतुलनीय असते. आई जशी प्रेम, माया आणि वात्सल्याचे प्रतीक असते, तसेच वडील हा कुटुंबाचा खंबीर आधारस्तंभ असतो. वडील म्हणजे कुटुंबाचे संरक्षण करणारा वृक्ष जो स्वतः उन्हात उभा राहून आपल्या लेकरांना सावली देतो. माझ्या आयुष्यात माझ्या बाबांचे स्थान केवळ वडिलांचे नाही, तर ते माझे मार्गदर्शक, शिक्षक, मित्र आणि प्रेरणास्थान आहेत. माझे बाबा अत्यंत शांत, संयमी आणि कष्टाळू स्वभावाचे आहेत. ते जास्त बोलत नाहीत, पण त्यांच्या प्रत्येक शब्दात जीवनाचा अनुभव आणि शहाणपण असते. ते नेहमी योग्य मार्ग दाखवतात आणि चुकीच्या गोष्टींपासून दूर राहण्याची शिकवण देतात. राग आला तरी ते कधी कठोर शब्द वापरत नाहीत, तर प्रेमाने आणि संयमाने समजावून सांगतात. त्यांच्या या स्वभावामुळे आम्हाला त्यांच्याबद्दल केवळ आदरच नव्हे, तर एक आत्मीयता आणि विश्वासही वाटतो.

वडिलांचे प्रेम हे व्यक्त होण्यात कमी, पण कृतीतून अधिक दिसते. ते आपल्या भावना शब्दांत व्यक्त करत नाहीत, पण त्यांच्या प्रत्येक कृतीतून त्यांचे प्रेम स्पष्ट जाणवते. त्यांच्या प्रेमाची गोडी मुरलेल्या मुरंब्यासारखी असते. काळ जसजसा पुढे सरकतो, तितकी ती अधिक गहिरी होत जाते. आमच्या प्रत्येक छोट्या-छोट्या इच्छांची पूर्तता करण्यासाठी ते दिवस-रात्र मेहनत करतात. स्वतःच्या इच्छा, गरजा आणि सुख यांना ते नेहमीच मागे ठेवतात. घरातील जबाबदाऱ्या पार पाडताना ते कधीही थकत नाहीत. त्यांच्या चेहऱ्यावरचा थकवा लपवून ते नेहमी आम्हाला हसतमुखाने भेटतात. त्यांच्या कष्टांमुळेच आमच्या आयुष्यात स्थैर्य आणि सुरक्षितता निर्माण झाली आहे. त्यांच्यामुळेच आम्ही निश्चिंतपणे स्वप्ने पाहू शकतो आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करू शकतो.



# बाबा- आयुष्याचे शिल्पकार

माझे बाबा शिक्षणाला खूप महत्त्व देतात. “शिक्षण हेच खरे धन आहे” हा त्यांचा ठाम विश्वास आहे. ते नेहमी आम्हाला चांगले शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करतात आणि जीवनात प्रामाणिकपणा, कष्ट आणि शिस्त या मूल्यांचे महत्त्व सांगतात. त्यांच्या या शिकवणीमुळे आमच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक बदल घडतो आहे. त्यांनी दिलेले संस्कार हे आमच्या आयुष्याची खरी संपत्ती आहेत.वडील म्हणजे केवळ कुटुंबाचा आर्थिक आधार नाही, तर ते आपल्या जीवनाचा खरा शिल्पकार असतात. जसे शिल्पकार एका दगडाला सुंदर मूर्तीत रूपांतरित करतो, तसेच वडील आपल्या मुलांच्या जीवनाला योग्य आकार देतात. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच आपण योग्य दिशा निवडू शकतो आणि आयुष्यात यशस्वी होऊ शकतो.

आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकदा आपण वडिलांच्या कष्टांकडे दुर्लक्ष करतो, पण त्यांच्या त्यागाचे महत्त्व समजून घेणे खूप आवश्यक आहे. त्यांच्या प्रेमाची जाणीव ठेवून त्यांचा आदर करणे आणि त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.माझ्यासाठी माझे बाबा हे खरे हिरो आहेत. त्यांच्या कष्ट, त्याग, प्रेम आणि संस्कारांमुळेच माझे आयुष्य घडत आहे. म्हणूनच, वडील हे खऱ्या अर्थाने आपल्या आयुष्याचे शिल्पकार असतात–जे आपल्या भविष्याला आकार देतात आणि जीवनाला अर्थपूर्ण बनवतात.

**कु. संस्कृती विलास गंधट**
द्वितीय वर्ष वाणिज्य शाखा



# नारी अस्मिता - स्त्रीशक्तीच्या सामर्थ्याची गाथा

समाजाच्या पटलावर अशा काही व्यक्ती उमटतात ज्या केवळ स्वतःचे आयुष्य जगत नाहीत, तर आपल्या अस्तित्वाने इतरांच्या आयुष्यात प्रकाशाची, आनंदाची, उत्साहाची लकिर घेऊन येतात. होय मी बोलतेय  नारी अस्मितेवर! जिसे व्यक्तिमत्व म्हणजे शालीनता, प्रतिभाशील, कर्तुत्ववान, गुणवान, तेजस्वी आणि प्रेरणेचा एक अनोखा संगम म्हणजे स्त्रीशक्ती. तिच्या मनाच्या गाभाऱ्यात शालिनीता दडलेली असते तिचे वागणे बोलणे इतके संयमीत असते की समोरच्याला तिच्याबद्दल आदर वाटल्याशिवाय राहत नाही तिच्या डोळ्यात एक प्रकारचा प्रामाणिकपणा सदैव चमकत असतो.आजच्या धावपळीच्या आणि दोघी जगात तिची तत्त्वनिष्ठा तिला इतरांपेक्षा वेगळे ठरवते ती आपल्या ज्ञानाने आणि मूल्यांनी जग उजळवते तिच्यातल्या बाह्य सौंदर्यापेक्षा अंतर्गत तेज जास्त प्रभावी असते तिचे प्रत्येक पाऊल हे विश्वासाने पडते आणि तिचे बोलणे जणू शब्दातून वाहणारे संथ सरीताच.



तिकडे घरापूर्ती मर्यादित नसून आपल्या कार्यक्षेत्रात तिने एक वेगळा ठसा उमटवलेला आहे तिच्या कर्तृत्वात एक प्रकारचीच चमक दिसते ती पाहणाऱ्याला थक्क करते आव्हानांना न डगमगता सामोरे जाण्याची तिची वृत्ती अनेकांसाठी प्रेरणास्त्रोत ठरली आहे तिच्या कार्याची व्याप्ती मोठी असली तरी तिच्यात कुठेही अहंकाराचा लवलेश देखील नसतो साधी राहणे आणि उच्च विचारसरणी हे तिच्या जगण्याचे सूत्र आहे. "जिच्या नयनी पान्हा हृदयी पान्हा" या उक्तीप्रमाणे तिचे हृदय करुणेने भरलेले आहे. वरून कठोर वाटली तरी तिच्या मनात सर्वांबद्दल अपार प्रेम आहे ते आपल्या हृदयाच्या कोपऱ्यात नात्यांची आणि स्नेहाची जपणूक अतिशय हळुवारपणे करते एका स्त्रीसाठी तिच्या प्रेमाचा मूर्तिमंत झरा सतत वाहत राहील आणि तिच्या प्रेमाचा दिवा अखंड तेवत राहील अशीच अपेक्षा तिच्या मनी असते. 'स्त्री ही बंदिनी' असं जरी जुन्या काळी म्हटले गेले असले तरी तिने आपल्या कर्तुत्वाने आणि विचारांनी त्या बेड्या तोडून मुक्त संचार केला आहे ती केवळ स्वतःसाठी जगत नाही तर वंचितांच्या आयुष्यात मायेचा आधार म्हणून उभे राहते.

स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वात मोठी शक्ती म्हणजे त्याची स्पष्टता ते जेव्हा बोलते तेव्हा तिच्या शब्दांतून एक प्रकारचा प्रांजळपणा आणि प्रभावीपणा ऐकताना मनाला एक प्रकारची शांतता लाभते आणि उभारी म्हणते तिचे आयुष्य म्हणजे एक अशी कथा आहे जी मनाला मोहून टाकते आणि अंतर्मुख करायला लावते. अशी स्त्री म्हणजे केवळ पराशक्तीचे मूळ आहे. ती एक विचार आहे, जिच्याकडे पाहून असे वाटते की स्त्री शक्तीने जर ठरवले तर विश्वाचे चित्र बदलू शकते तिथे हे चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभ सारखे कार्य करत राहील. शेवटी एवढेच म्हणेन,

संस्कृता स्त्री पराशक्ती स्वर हमारा है
विश्व हे परिवार भारत घर हमारा है I

**कु. अर्चना अशोक कदम**
प्रथम वर्ष कला शाखा



# आंतरवासितेतील पहिला अविस्मरणीय क्षण

मनुष्याच्या आयुष्यात अनेक क्षण येत असतात. काही वाईट असतात, तर काही चांगले. पण त्यापैकी काही क्षण माणसांच्या नेहमी लक्षात राहतात. तसाच माझ्या आयुष्यातील तो क्षण आजही माझ्या लक्षात आहे. मला आजही आठवतो तो दिवस जेव्हा मी डि.एड च्या व्दितीय वर्षाच्या आंतरवासितेसाठी शाळेत शिकवायला गेली होते. त्या दिवशी मी नेहमीपेक्षा खूप लवकर उठले होते. मनात उत्सुकता, आनंद, भीती आणि किंचितसे दडपणही आले होते. विदयार्थी म्हणून मी अनेक वेळा शाळेत गेले होते. पण आज आपण पहिल्यांदा आंतरवासितेसाठी का असेना, पण शिक्षिका म्हणून शाळेत शिकवायला जाणार ही भूमिकाच वेगळी,जबाबदारीची आणि अत्यंत महत्त्वाची होती.

सकाळची दिनचर्या मार्गी लावून महाविद्यालयाचा युनिफॉर्म घातला. केसांना अगदीच चापून चोपून बसवले कारण शिक्षिकेला सुद्धा शिस्त असणे गरजेचे असते. तेव्हा चेहऱ्यावर एक वेगळाच हास्य उमटले होते जसे काय मी स्वतःलाच बजावत होते आज तू विद्यार्थी नाहीस तर एक शिक्षिका आहेस. माझ्या पिशवीत मी खडू, शिकवण्यासाठी बनवण्यात आलेले वेगवेगळे चार्ट, वही, पेन, एक छोटसं गाण्याचा पुस्तक, तसेच मी बनवलेली अभ्यास टिपणे अशा सर्व शैक्षणिक वस्तूंना माझ्या मैत्रिणी बनवल्या होत्या कारण पुढचे काही तास मी त्यांच्यासोबतच मुलांना अभ्यासामध्ये समरस करून घेणार होते. मुलांशी मैत्री करायची असेल तर गाणं हे आलंच पाहिजे म्हणून पुन्हा एकदा गाण्याची पुस्तकही वाचून काढली. आई-वडिलांचा आशीर्वाद घेत घराच्या बाहेर पडले कारण तो दिवस माझ्यासाठी परीक्षेतील प्रश्नपत्रिकेसारखा होता अन उत्तरपत्रिका मात्र मुलांच्या चेहऱ्यावर उमटणार होती. खोलीत पाऊल टाकताच मनात एक हलकीशी धडधड सुरू झाली. कारण हा दिवस काही साधा नव्हता हा माझ्या आयुष्याला नवीन वळण देणारा दिवस होता.

हळूहळू मी स्वतःला सावरलं. भोवतालचं वातावरण न्याहाळू लागले. भिंतींवर काढलेली रंगीत चित्रं, खिडकीतून येणारा मंद वारा, आणि खोलीत बसलेले छोटे-छोटे विद्यार्थी सगळंच काहीसं नवीन, पण मनाला भिडणारं होतं. त्यांच्या चेहऱ्यांवर उत्सुकता होती, आणि डोळ्यांत नवी स्वप्नं. थोड्याच वेळात सगळे एकत्र जमलो. कुणी हसत होतं, कुणी गप्पा मारत होतं, तर कुणी शांतपणे आजूबाजूचं निरीक्षण करत होतं. "गुड मॉर्निंग टीचर" असा एकसुरात आवाज घुमला आणि वातावरणात एक वेगळीच ऊर्जा पसरली. त्या क्षणी मला जाणवलं मी एकटी नाही, माझ्यासारखे अनेक जण या नव्या प्रवासाला सुरुवात करत आहेत. परीक्षेला बसताना मनात अनेक प्रश्न होते, पण त्याच वेळी एक वेगळीच ओढही होती. माझ्या मैत्रिणींनी माझी ओळख करून दिली आणि हळूहळू मीही त्या वातावरणात मिसळत गेले. फुलांसारखी हसणारी चेहरे, गप्पांचा मंद गुंजारव सगळंच काही मनाला स्पर्शून गेलं. त्या दिवशी मला एक गोष्ट उमगली शाळा म्हणजे फक्त अभ्यासाची जागा नाही, तर ती अनुभवांची, मैत्रीची आणि स्वतःला शोधण्याची एक सुंदर दुनिया आहे.

# आंतरवासितेतील पहिला अविस्मरणीय क्षण

लहान विद्यार्थ्यांची मनस्थिती चांगली उत्साहवर्धक करण्यासाठी आम्ही त्यांच्याकडून वेगवेगळ्या नवनवीन क्रिया करून घेतल्या. नवनवीन खेळांच्या माध्यमातून गाण्यांच्या माध्यमातून त्यांना आपलेपणाची जाणीव करून दिली.

या रे या सा रे या...
गप्पा गोष्टी मारूया
या रे या सा रे या...
खोड्या आपण काढूया
या रे या सा रे या...
पाठीवरती पेन्सिल गिरवूया
या रे या सा रे या...
मस्तीची शाळा भरवूया

अशाप्रकारे गाण्यांच्या माध्यमातून आम्ही त्या मुलांना अभ्यासाची गोडी कधी लावली हे आम्हालाही उमगले नाही. माझा पहिलाच तास हा गणिताचा होता. गणित म्हणजे डोक्याचा व्यायाम आणि संयमाची परीक्षा, परंतु मुलांनीही अगदी चुटकी सरशी ही संयमाची परीक्षा अगदी हसत खेळत सोडवली.

आता मात्र आम्ही परतीच्या प्रवासाला लागणार होतो. पहिला दिवस असल्यामुळे मुलांनी आणि त्यांच्या शिक्षकांनी देखील आमच्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन केले होते त्यात काही मुलांनी अगदी गोड आवाजात काव्यवाचन तर काहींनी नृत्य सादरीकरण करून दाखवले. तेव्हा खरंच या कलाकार मंडळींचे कौतुक वाटले. आंतरवासिकेतील शेवटचे काही क्षण आम्ही सगळ्यांनी एकत्र घालवले. त्या क्षणांना एक वेगळीच ऊब होती हसण्यातही थोडा ओलावा आणि गप्पांमध्ये एक हलकीशी उदासी दडलेली होती. मुलांसोबत घालवलेले ते क्षण इतके जिव्हाळ्याचे झाले होते की, वेळ थांबून राहावा असंच वाटत होतं. कुणी जुन्या आठवणींना उजाळा देत होतं, तर कुणी पुढच्या भेटीची आशा व्यक्त करत होतं. प्रत्येक हसू, प्रत्येक शब्द, प्रत्येक नजर सगळंच काही मनात कायमचं कोरलं जात होतं. निरोपाच्या त्या क्षणी ओठांवर हसू असलं तरी डोळ्यांत दडलेली ओल मात्र सगळं सांगून जात होती. त्या दिवसाने आम्हाला शिकवलं क्षण जातात, पण त्यांच्यात जपलेल्या आठवणी मात्र आयुष्यभर सोबत राहतात. त्यातूनही शिक्षकाच्या आयुष्यातील पहिला दिवस आयुष्यभर लक्षात राहणारा असतो तू केवळ माझ्यासाठी एक आंतरवासिकेचा दिवस नव्हता तर माझ्या आयुष्यातील अविस्मरणीय ठेवा होता.

**कु. पूजा गौतम बागडे**
प्रथम वर्ष कला शाखा

# माझे भविष्यातील स्वतः ला पत्र

येथील सर्व वाचकांना मला असे विचारायचे आहे, की तुमचा मनात हा प्रश्न आलाच असेल ही लेखिका, आज नेमके कोणते लेखन करणार असेल ? असो, माझ्या चेहऱ्यावरचा रंग कोणता असावा हे माझ्या हातात नव्हते. मी कोणाच्या पोठी जन्म घ्यावा हेही माझ्या हातात नव्हते.हातांच्या रेषांवर नव्हे तर तळहाताच्या मागे असणाऱ्या पिळदार मनगटातं तुमचं भविष्य सामावलेल असतं; हाच संदेश मी इथे मांडत आहे. आज तुमच्या समोर एका वेगळ्याच पण मनाला स्पर्श करणाऱ्या विषयावर माझ्या मनाशी जपून ठेवलेलं पत्र मांडणार आहे. हे पत्र मी लिहिले आहे भविष्यातील स्वतःला. हो! स्वतःलाच कारण अनेकदा आपण इतरांशी खूप बोलतो पण स्वतःशी मात्र नाही.

मंडळी तुम्हाला माहित आहे का हो ?

हा विषय खरंच पेचात टाकणारा, कोड्यात टाकणारा, आणि भविष्याचे वेध घ्यायला लावणारा असा विषय आहे.

"माझ्या भविव्यातील स्वतःला पत्र."माझ्या मनात एक विचार आला 'माझे भविष्य, 'त्यात पुन्हा मीच, म्हणजे हे आरशात पाहून त्या ठिकाणी पिकलेला केस शोधण्यासारखं नाही का ? पांढरा केस जी जाणीव मनात उत्पन्न करून देतो तीच जाणीव आज हे पत्र लिहिताना माझ्या मनात झाली आहे. बरं, वळते मग, माझ्या आयुष्यात आणि लिहिते एक स्वतःला पत्र.



# माझे भविष्यातील स्वतः ला पत्र

प्रिय भविष्यकालीन सखी, सप्रेम नमस्कार!

तू हे पत्र वाचत असताना, कदाचित तुझं आयुष्य एका वेगळ्या वळणावर असेल. कदाचित तू यशस्वी झाली असशील किंवा अजूनही वाटचाल करत असशील हे फक्त एक पत्र नाही, ही आठवणींची एक उमलती कळी आहे, जी 'मी' म्हणजेच 'तू'. आज तू एक विद्यार्थिनी नाहीस तर तू एक 'संस्कृता' आहेस 'संस्कृता' म्हणजे नेमकी कोण? तर स्वप्नांनी भारलेली.... अपेक्षांनी वेढलेली.... आणि भविष्याचे रंगीत चित्र मनात रंगवणारी. महर्षी कर्वेजींनी तीन, चार मुलींना घेऊन स्थापन केलेल्या या एस.एन डिटीचे वटवृक्ष आता बहरले आहे आणि त्याचाच तू एक भाग झाली आहेस. तुझ्या आजच्या प्रत्येक कार्यात एक संघर्ष, जिद्द आहे. वेळेवर अभ्यास करणं, चुकलेली उत्तरं सुधारणं, अपयश पचवणं, आणि पुन्हा उभं राहणं. कधी थकल्यासारखं वाटतं, पण तरीही तू चालतेस... कारण मला माहित आहे, तूच माझं उत्तर अन् तूच माझं गंतव्य आहेस.

"जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी"

अर्थात हे सुरेख सुभाषित जेव्हा आपल्या कानी पडते तेव्हा 'आई' आणि 'मातृभूमी' या स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ आहेत याची प्रचिती आवर्जून होते. आज तुझा जन्म अशाच एका दैदिप्यमान इतिहास लाभलेल्या देशात झाला आहे हे तू विसरू नकोस. कारण याच मातृभूमीने शूर सैनिक, महान संत, ज्ञानी तत्ववेत्ता आणि संस्कृतीचे रक्षक घडवले आहेत. विविधतेने नटलेल्या आणि विविधतेतही एकता जपलेल्या देशात तुला उंच भरारी घ्यायची आहे."कोमल हे कमजोर नही तू, शक्ती का नाम नारी है जग को जीवन देने वाली मौत भी तुझसे हारी है।" आज तू एक सबला नारी आहेस. माया, ममता, शक्ती आणि जबाबदारीच मूर्त रूप तू आहेस. स्वतःला शिकवता शिकवता घडवत जाणं, ठेच लागून पडलीस तर पुन्हा उठून चालत राहणं, स्वतंत्र निर्णय घेत अन्यायाचा विरोध करणे आणि स्वाभिमान टिकवणे हे तुझं आद्य कर्तव्य आहे.

काय गं! तुला आठवतंय? तू लहान असताना 'कस्तुरीमृग' म्हणून एक धडा तू अभ्यासला होतास. कस्तुरीमृग हा एक असा सुंदर प्राणी ज्याच्या बेंबीतच सुवासिक गंध दडलेला असतो. परंतु तो सुगंध घेण्यासाठी ते स्वतः सैरभैर पळते. आपलंही काहीसं असंच आहे. नाही?.... भविष्य प्रकाशमय करण्यासाठी स्वतःमध्ये असलेल्या गुणदोषांची, सत् - असत् गोष्टींची, स्वतःच्या कुवतीची, गोळाबेरीज करून मनगटात असणाऱ्या ताकतीच्या जोरावर माणूस नक्कीच स्वतःच्या पाऊलखना रेखाटू शकतो आणि भविष्याचा वेध घेऊ शकतो.

# माझे भविष्यातील स्वतः ला पत्र

आज मी वर्तमानात उभी आहे, पण माझं लक्ष भविष्याकडे लागलेलं आहे; म्हणजेच तुझ्याकडे. जिच्या खांद्यावर कुटुंब, समाज, राष्ट्र आणि देश घडवण्याची मोठी जबाबदारी आहे. माझी इच्छा आहे की तू एक अशी स्त्री बनली असशील जी कुटुंबाला केवळ प्रेमानेच नव्हे, तर विचारांनी, सहकार्याने आणि मूल्यांनी जोडून ठेवेल. तू आई, मुलगी, बहीण, पत्नी या प्रत्येक भूमिकेला समर्पित असशील. तुझ्या हातून घरात शांततेचं, समतेचं आणि प्रगतीचं वातावरण निर्माण झालं असेल, ही माझी आशा आहे. माझा विश्वास आहे की तू समाजात फक्त सहभागी न होता, समाज घडवणारी सजग नागरिक असशील. तू इतर स्त्रियांना प्रेरणा देणारी खंबीर स्त्री असशील. शिक्षण, स्वावलंबन, आत्मविश्वास यांचा दीप त्यांच्या आयुष्यात तेवत ठेवणारी त्यांची दिशादर्शक असशील. रुढी-परंपरांच्या बंदिवासातून समाजाला बाहेर काढण्याचं धाडस करशील. तू केवळ कुटुंबापुरती वा घरापुरती मर्यादित राहिली नसशील, तर राष्ट्राच्या विकासातही आपला ठसा उमटवला असशील. शिक्षण, विज्ञान, कला, प्रशासन अशा कुठल्याही क्षेत्रात तुझे योगदान असेल. तू स्वतःचं मत मांडणारी, निर्णय घेणारी आणि जबाबदारी पेलणारी स्त्री झाली असशील.

माझी इच्छा आहे की तू एक समंजस नागरिक बनली असशील. तुझं देशावरील प्रेम केवळ भावनेतून नाही तर कृतीतून दिसेल. तू पर्यावरण, न्याय, समता, आणि स्वातंत्र्य यासाठी उभी राहत असशील. प्रिय भविष्यातील "मी",

तुला हे पत्र आठवण करून देतं की तू केवळ स्वतःपुरती जगणारी नसून एक निर्माती आहेस. कुटुंबाची, समाजाची, राष्ट्राची, आणि अखेर देशाचीही. वर्तमानातील संधीचे सोने करण्यासाठी करावा लागणारा संघर्ष ही उज्ज्वल भविष्याची नांदी असते. भविष्य उजळण्यासाठी वर्तमानात प्रामाणिक रहा या प्रवासात कुठेही थांबू नकोस. कारण तू "संस्कृता" आहेस, म्हणजेच तू शक्ती आहेस ! शेवटी जाता जाता एवढंच सांगेन,भविष्यातील माझ्या स्वतःला लिहिलेले हे पत्र म्हणजेच भविष्यातील भविष्याचे सुरू झालेले नूतन सत्र.

**कु. समीरा अनंत रेडकर**
प्रथम वर्ष वाणिज्य शाखा



# बालपणातील खेळ आणि कथा

मानवी जीवनातील सर्वात सुंदर, निरागस आणि आनंदी काळ म्हणजे बालपण होय. या काळात मन निष्पाप असते, विचार स्वच्छ असतात आणि जगाकडे पाहण्याची दृष्टी वेगळी असते. बालपण म्हणजे हसणे, खेळणे, गोष्टी ऐकणे आणि प्रत्येक गोष्टीत आनंद शोधणे. या बालपणाला खरे अर्थाने समृद्ध करणारे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे खेळ आणि कथा. खेळांमुळे शरीर घडते, तर कथांमुळे मन घडते. बालपण हा माणसाच्या आयुष्याचा पाया असतो. या वयात जे अनुभव मिळतात, जे संस्कार होतात, ते संपूर्ण आयुष्यावर प्रभाव टाकतात. बालपणी शिकलेले धडे, खेळताना निर्माण झालेले मित्रत्व आणि ऐकलेल्या कथा आयुष्यभर आठवणीत राहतात. म्हणूनच बालपणाचा काळ अतिशय महत्त्वाचा मानला जातो.

खेळ हा बालपणाचा अविभाज्य भाग आहे. खेळाशिवाय बालपणाची कल्पनाच करता येत नाही. पूर्वीच्या काळात मुले मैदानी खेळ खेळत असत. कबड्डी, खो-खो, लंगडी, विटीदांडू, लगोरी, गोट्या, भोवरा, पळापळी असे खेळ सर्वत्र खेळले जात. या खेळांमुळे शरीर मजबूत होत असे. चपळता, ताकद आणि सहनशक्ती वाढत असे. खेळ खेळताना नियम पाळावे लागतात. त्यामुळे शिस्त लागते. संघात खेळताना एकमेकांना मदत करणे, एकमेकांचा आदर करणे शिकायला मिळते. जिंकले तर आनंद आणि हरले तर ते स्वीकारण्याची सवय खेळातूनच लागते. खेळ म्हणजे निव्वळ आनंद. खेळताना मुलांच्या चेहऱ्यावर दिसणारे हसू खूप सुंदर असते. खेळामुळे तणाव कमी होतो आणि मन प्रसन्न राहते.



# बालपणातील खेळ आणि कथा

खेळ जसे शरीरासाठी महत्त्वाचे आहेत, तसेच कथा मनासाठी महत्त्वाच्या आहेत. पूर्वी रात्री झोपण्यापूर्वी आजी किंवा आई मुलांना गोष्टी सांगत असे. राजा-राणीच्या, परीकथा, पंचतंत्राच्या गोष्टी मुलांना खूप आवडत. त्या कथा ऐकताना मुले कल्पनेच्या दुनियेत रमून जात. कथांमधून चांगले आणि वाईट यातील फरक समजतो. प्रामाणिकपणा, सत्य, दयाळूपणा, मेहनत, धैर्य यांसारखी मूल्ये कथांमधून सहजपणे मनावर बिंबतात. उपदेश न करता कथा संस्कार देतात. कथा ऐकल्यामुळे मुलांची भाषा सुधारते. नवे शब्द कळतात. विचार करण्याची सवय लागते. प्रश्न विचारण्याची आणि उत्तर शोधण्याची क्षमता वाढते. खेळ आणि कथा हे एकमेकांना पूरक आहेत. खेळ शरीराला बळ देतात, तर कथा मनाला दिशा देतात. खेळ मुलांना सक्रिय बनवतात, तर कथा संवेदनशील बनवतात. म्हणूनच संतुलित बालपणासाठी खेळ आणि कथा दोन्ही आवश्यक आहेत.

आजच्या काळात बालपण बदलत चालले आहे. मैदानी खेळांची जागा मोबाईल, टीव्ही आणि व्हिडिओ गेम्स यांनी घेतली आहे. आजी-आईच्या गोष्टी ऐकण्याऐवजी मुले मोबाईलवर कार्टून पाहतात.यामुळे मुलांची शारीरिक हालचाल कमी होत आहे. एकटेपणा वाढत आहे. कल्पनाशक्ती आणि सामाजिक संवाद कमी होत चालला आहे.आजच्या काळात पारंपरिक खेळ आणि कथा जपणे खूप गरजेचे आहे. पालकांनी मुलांना मैदानी खेळांसाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. कथा सांगण्याची परंपरा पुन्हा सुरू केली पाहिजे. यामुळे मुलांचे बालपण अधिक आनंदी आणि सुसंस्कृत होईल.

शेवटी असे म्हणता येईल की, बालपणातील खेळ आणि कथा हे जीवन घडवणारे महत्त्वाचे घटक आहेत. खेळांमुळे शरीर निरोगी राहते, तर कथांमुळे मन समृद्ध होते. आनंदी आणि सुसंस्कृत समाज घडवायचा असेल तर बालपणातील खेळ आणि कथांना योग्य महत्त्व देणे आवश्यक आहे. कारण सुंदर बालपण म्हणजे उज्ज्वल भवितव्याची पहिली पायरी होय.

**कु. संध्या गायकवाड**
द्वितीय वर्ष, समाजशास्त्र विभाग



# शेतकऱ्याची व्यथा

मैदानावर टाळ्यांचा गजर,
करोडोंची उधळण चालते,
मातीत राबणारा शेतकरी मात्र
अश्रूंमध्येच आयुष्य घालवतो... ॥१॥

अरे एक दिवस तरी तुम्ही
शेतीत जाऊन पाहा,
कडक उन्हात, पावसात
त्याची झुंज अनुभवून पाहा... ॥२॥

त्याला नकोत मोठे पुरस्कार,
नकोत नावांचे सन्मान,
फक्त त्याच्या कष्टाला योग्य
मिळू द्या खरा मान... ॥३॥
ना करोडोंची स्वप्ने त्याची,

ना मोठी अपेक्षा काही,
पिकाला योग्य भाव मिळाला
तरच हसतील त्याची पाही... ॥४॥

भारत कृषीप्रधान म्हणतो आपण,
पण विचार करा जरा,
शेतकरी जगला तरच देश जगेल,
हे लक्षात ठेवा सदा... ॥५॥

**कु. करिना गावडे**
प्रथम वर्ष कला शाखा



# माझा अविस्मरणीय क्षण

आपल्या आयुष्यात अनेक क्षण येतात आणि निघून जातात. काही क्षण क्षणभर आनंद देतात आणि विस्मृतीत हरवून जातात, तर काही क्षण असे असतात की ते आपल्या मनाच्या कप्प्यात कायमचे घर करून बसतात. हेच क्षण आपल्याला घडवतात, आपल्याला नव्याने ओळख करून देतात आणि आयुष्यभर प्रेरणेचा स्रोत बनून राहतात. माझ्यासाठी असा एक अविस्मरणीय आणि मनात खोलवर कोरलेला क्षण म्हणजे माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच संपूर्ण वर्गासमोर माझे झालेले कौतुक. हा क्षण केवळ आनंदाचा नव्हता, तर तो माझ्या आयुष्याला एक नवा आत्मविश्वास देणारा, माझ्या क्षमतेची जाणीव करून देणारा आणि मला स्वतःवर विश्वास ठेवायला शिकवणारा एक अमूल्य अनुभव होता.

त्या दिवसाची आठवण आजही माझ्या मनात अगदी जिवंत आहे. आमच्या कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एक छोटा उपक्रम आयोजित केला होता. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना त्यांच्या कला, विचार आणि कौशल्ये सादर करण्यासाठी एक व्यासपीठ उपल करून देणे हा होता. प्रत्येकाला आपली वेगळी ओळख निर्माण करण्याची संधी मिळत होती. या कार्यक्रमात सहभागी होण्याचा निर्णय घेताना माझ्या मनात खूप द्विधा मनःस्थिती होती. एकीकडे स्वतःला सिद्ध करण्याची इच्छा होती, तर दुसरीकडे अपयशाची भीती, लोकांसमोर उभं राहण्याचा संकोच आणि "मी करू शकेन का?" हा प्रश्न सतत मनात येत होता.

तरीही, काहीतरी नवीन करण्याची ओढ मला पुढे नेत होती. मी धैर्य एकवटले आणि या उपक्रमात सहभाग घेण्याचे ठरवले. कार्यक्रमाचा दिवस जवळ येत असताना माझी धडधड वाढत होती. स्टेजवर उभं राहण्याचा विचार जरी मनात आला तरी हातपाय गार पडत होते. पण त्या क्षणी मी स्वतःलाच समजावलं की जर ही संधी सोडली, तर कदाचित पुन्हा अशी संधी मिळणार नाही. शेवटी तो दिवस उजाडला. सभागृहात सगळे विद्यार्थी, शिक्षक आणि मित्र उपस्थित होते. प्रत्येक जण आपली कला सादर करत होता. माझा क्रमांक जसजसा जवळ येत होता, तसतशी माझी घालमेल वाढत होती. पण आत कुठेतरी एक आवाज मला सांगत होता – "तू हे करू शकतेस." आणि मग तो क्षण आला. मी स्टेजवर पाऊल ठेवले. सुरुवातीला थोडी भीती जाणवत होती, पण काही क्षणांतच मी स्वतःला सावरले आणि आत्मविश्वासाने माझी प्रस्तुती सुरू केली.



माझं बोलणं पुढे सरकत असताना माझ्या मनातील भीती हळूहळू कमी होत गेली. मी पूर्णपणे माझ्या सादरीकरणात रमले. त्या काही मिनिटांत मला माझ्याभोवतालचं काहीच जाणवत नव्हतं. जणू मी आणि माझे शब्द - एवढंच अस्तित्व होतं. आणि शेवटी, मी माझं सादरीकरण पूर्ण केलं.

क्षणभर शांतता पसरली आणि पुढच्याच क्षणी संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या गजराने दुमदुमून गेले. त्या टाळ्यांचा आवाज माझ्यासाठी केवळ कौतुक नव्हता, तर तो माझ्या धैर्याचा, माझ्या प्रयत्नांचा आणि माझ्या आत्मविश्वासाचा स्वीकार होता. माझे शिक्षक हसतमुखाने "खूप छान!" असे म्हणाले, आणि माझ्या मित्रांनी अभिमानाने हात हलवून मला प्रोत्साहन दिलं. त्या क्षणी माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.तो क्षण माझ्यासाठी अत्यंत खास होता, कारण त्या क्षणी मला जाणवलं की आपण स्वतःच्या भीतीवर मात केली, तर आपण कोणतीही गोष्ट साध्य करू शकतो. भीती ही फक्त आपल्या मनात असते, आणि तिच्यावर विजय मिळवण्यासाठी फक्त एक पाऊल पुढे टाकण्याची गरज असते.

त्या दिवसाने मला एक महत्त्वाचा धडा शिकवला - संधी कधीही सोडू नये. प्रत्येक संधी ही आपल्याला काहीतरी नवीन शिकवते, आपल्याला अधिक सक्षम बनवते. जर आपण स्वतःवर विश्वास ठेवला, तर अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होऊ शकतात.आजही, जेव्हा कधी मला कोणत्याही गोष्टीबद्दल भीती वाटते किंवा आत्मविश्वास डळमळतो, तेव्हा मी त्या दिवसाची आठवण काढते. त्या टाळ्या, ते कौतुकाचे शब्द आणि त्या क्षणी जाणवलेली सकारात्मक ऊर्जा मला पुन्हा उभारी देते. मला आठवण करून देते की मी सक्षम आहे, आणि मी कोणतीही अडचण पार करू शकते.

हा क्षण माझ्यासाठी विशेष आहे, कारण त्याने मला माझ्या क्षमतेची जाणीव करून दिली. त्याने मला स्वतःकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलून टाकला. आज मी जे काही आहे, त्यामध्ये त्या एका क्षणाचा मोठा वाटा आहे. म्हणूनच, हा दिवस माझ्या आयुष्यातील सर्वात सुंदर, प्रेरणादायी आणि कायम आठवणीत राहणारा आवडता क्षण आहे. तो मला सतत पुढे जाण्याची, नव्या गोष्टी करण्याची आणि स्वतःवर विश्वास ठेवण्याची प्रेरणा देत राहतो.

**कु. सानिका पादड**
प्रथम वर्ष मराठी माध्यम



# खरा मित्र

ज्याला आपण मनातले बोल
न बोलता कळतात
त्यांच्याशीच मनाची खोल
नाती बनतात .... तो खरा मित्र

जो आपल्याला आपण कोण आहोत
व काय आहोत याची जाणीव करून
देतो .... तो खरा मित्र
जो आपल्या सुखात आणि दुःखात
नेहमी सोबत असतो ..... तो खरा मित्र

जो कोणत्याही शब्दाविना आपल्या भावना
ओळखतो .... तो खरा मित्र
जो आपल्या हजार चुका
माफ करतो .... तो खरा मित्र

जो आपल्यामुळे किती दुखावला गेला
तरी आपल्यावर जीव लावतो ... तो खरा मित्र
असे खूप मित्र असतात पण
जो आपल्याला शेवटपर्यंत
साथ देतो ..... तो खरा मित्र
तो खरा मित्र

**कु. अश्विनी चव्हाण**
तृतीय वर्ष, मराठी विभाग



# हरवलेली मराठी शाळा व बालपण

मातीच्या अंगणात उभी असलेली एक लहानशी शाळा होती. कौलारू छपराखाली विसावलेली, काळाच्या उन्हा-वाऱ्याशी शांतपणे संवाद साधणारी. त्या शाळेच्या ओसरीवर पाऊल टाकताच बालपण जणू धावत येऊन मिठी मारायचं. घंटी वाजायची तेव्हा केवळ तास सुरू होत नसे, तर मनाच्या आकाशात नवा प्रकाश पसरायचा. फळ्यावर उमटणारी अक्षरं डोळ्यांना दिसायची, पण मनावर उमटणारे संस्कार आयुष्यभर साथ देणारे असायचे.

मातीच्या वासात न्हालेली शाळा,

हसऱ्या दिवसांची साठवण,
फळ्यावर नाही तर मनावर
लिहिलं जायचं आमचं बालपण.

त्या काळात शाळेच्या इमारती साध्या होत्या. कौलारू छप्पर, मातीच्या भिंती, लाकडी बाक आणि खडूने भरलेला फळा- याच साधनांवर शिक्षणाचं मंदिर उभं होतं. त्या साधेपणात एक वेगळीच श्रीमंती होती. पावसाळ्यात छपरातून गळणारे पाणी, उन्हाळ्यात घामेजलेली कपाळं, हिवाळ्यात अंगावर येणारा गार वारा - या सगळ्यांतून शिकण्याची खरी मजा मिळायची. आजच्या चकचकीत वर्गखोल्यांमध्ये सुविधा आहेत, पण त्या मऊ ऊबेची कमतरता जाणवते. मराठी शाळेत भाषा शिकवली जात नव्हती, भाषा जगली जात होती. अक्षरं गिरवत असताना हात कधी थरथरायचा, पण मनात समाधान असायचं. कविता म्हणजे फक्त पाठांतर नव्हतं; ती भावना व्यक्त करण्याची वाट होती. गोष्टी ऐकताना आपण त्या कथेतच शिरून जायचो. त्या कथांमधून चांगलं आणि वाईट कळायचं, माणूसपण शिकायला मिळायचं. मराठी भाषेने विचारांना स्पष्टता दिली आणि मनाला ओळख दिली.



शिक्षक म्हणजे त्या काळात आधारवड होते. त्यांच्या आवाजात शिस्त होती, पण त्या शिस्तीत माया होती. चूक झाली तर समज दिली जायची, बरोबर केलं तर शाबासकी मिळायची. ते केवळ पुस्तकातील धडे शिकवत नव्हते, तर आयुष्याचे धडे देत होते. त्यांच्या वागण्यातून प्रामाणिकपणा, संयम आणि माणुसकी शिकायला मिळायची. बालपण म्हणजे निरागसतेचा झरा. मराठी शाळेचं बालपण तर त्या झऱ्याचं निर्मळ पाणी होतं. सुट्टीची घंटा वाजली की सगळं अंगण जिवंत व्हायचं. खेळताना वेळ कसा निघून जायचा, ते कळायचंच नाही. मित्र म्हणजे त्या काळात खरी संपत्ती होती. भांडणं व्हायची, रुसवे-फुगवे यायचे; पण ते फार काळ टिकत नव्हते. एका डब्यातला खाऊ सगळ्यांचा असायचा. आनंद आणि दुःख सगळं एकत्र वाटलं जायचं.

त्या बाकावर बसलेलं अजूनही
एक लहानसं हसू आहे,
वय वाढलं, जग बदललं,
पण तिथेच थांबलं ते बालपण आहे.

मराठी शाळेतील सण-उत्सव म्हणजे आनंदाचे सोहळे होते. गणेशोत्सवात शाळा फुलायची, स्वातंत्र्यदिनाला देशप्रेम मनात रुजायचं, शिक्षकदिनाला कृतज्ञता व्यक्त करायला शिकवलं जायचं. नाटकं, गाणी, भाषणं यातून आत्मविश्वास वाढायचा. शाळा म्हणजे केवळ अभ्यासाचं ठिकाण नव्हतं; ती संस्कारांची शाळा होती. आज चित्र बदललं आहे. इंग्रजी माध्यमाच्या आकर्षणात मराठी शाळा मागे पडल्या आहेत. अनेक शाळा ओस पडल्या, काही बंद झाल्या. शिक्षण अधिक आधुनिक झालं, पण त्यासोबत साधेपणा हरवला. आजचं बालपण मोबाईल आणि पडद्यामागे अडकलेलं आहे. खेळ कमी झाले, संवाद कमी झाला आणि हसणंही जपून वापरावं लागतंय.

मराठी शाळा हरवणं म्हणजे केवळ एक इमारत बंद होणं नाही; ती आपल्या मुळांपासून तुटण्याची सुरुवात आहे. मातृभाषेतून मिळणारं शिक्षण मनाला जवळचं असतं. त्या भाषेतून विचार स्पष्ट होतात, भावना मोकळ्या होतात. मराठी शाळा म्हणजे संस्कारांची शिदोरी होती, जी आयुष्यभर उपयोगी पडत होती. आज गरज आहे ती मराठी शाळांकडे नव्याने पाहण्याची. आधुनिक शिक्षण स्वीकारताना आपली भाषा आणि आपली संस्कृती जपण्याची. कारण भाषा म्हणजे केवळ बोलण्याचं साधन नाही; ती ओळखीचा आरसा आहे.

आजही मन शोधतं ती शाळा,
ओसरी, बाक आणि फळा,
हरवलेलं बालपण परत यावं,

# हरवलेली मराठी शाळा व बालपण

अशीच मनात राहते एक आस जिव्हाळा.मराठी शाळा केवळ शिकवण देत नव्हती, ती जगण्याची दिशा दाखवत होती. त्या काळी स्पर्धा होती, पण माणसांची नव्हे तर स्वतःशी. "आज कालपेक्षा चांगलं करायचं" हीच खरी शिकवण होती. गुणपत्रिका हातात आल्यावर आई-वडिलांच्या डोळ्यांत दिसणारा अभिमान हा खरा पुरस्कार होता. शाळेच्या पायऱ्या चढताना मनात भीती नसायची, उलट एक आपुलकीची ओढ असायची. कारण ती शाळा आमची होती, आणि आम्ही तिचे होतो.मातीच्या अंगणात उभी असलेली शाळा जणू जीवनाची पहिली कविता होती. पावसाळ्यात अंगणात गाळ पडायची, पण खेळण्याच्या आनंदावर त्याचा परिणाम होत नसे. पाण्याची गंध, मातीतील ओलावा, घाम सांडताना अंगावर जाणारा वारा. या प्रत्येक अनुभवातून बालपणाची जादू उमलायची. अंगणातील झाडे फक्त सावली देत नसती; ती आमच्या कल्पनाशक्तीची शाळा होती. फांद्या झुला, लपवण आणि छुप्या गप्पांची जागा बनत.

शाळेच्या वाचनालयात गंध होता जुन्या पुस्तकांचा, खडू, फळा आणि धुळीच्या मिश्रणाचा. तिथे बसून आपल्याला जाणवायचं की शब्द फक्त वाचायचे नाहीत, ते अनुभवायचे आहेत. शिक्षकांचा आवाज जणू मृदू संगीत होता- कधी प्रेमळ, कधी कठोर, पण सदैव मार्गदर्शक. त्यांनी फक्त धडे शिकवले नाहीत; त्यांच्या दृष्टिकोनातून आयुष्य समजावून सांगितले. मातीच्या कुशीतून उमललेली शाळा फक्त इमारत नव्हती; ती संस्कारांची उभी ठेवलेली देवमंदिर होती. अक्षर ओळखण्यापेक्षा, माणसांच्या भावनांना समजून घेणं आणि विचारांना आकार देणं जास्त महत्त्वाचं होतं. मराठी शाळा हरवणं म्हणजे फक्त इमारत बंद होणं नाही, तर आपल्या मुळांपासून तुटण्याची प्रक्रिया आहे. आपल्या मातृभाषेतून शिकलेलं शिक्षण आपल्याला जवळ ठेवतं. त्या भाषेतून आपली विचारसरणी, संस्कार, सुसंवाद आणि माणुसकी शिकवली जाते. मराठी शाळा म्हणजे जीवनाचे गोडसर धडे, जी आपल्याला फक्त ज्ञान नाही तर जीवन शिकवते.



# हरवलेली मराठी शाळा व बालपण

हरवलेली मराठी शाळा आणि बालपण ही एक हळवी आठवण आहे, पण त्याहूनही ती एक हाक आहे – आपल्या मुळांकडे परत येण्याची. कारण ज्या दिवशी आपण आपली भाषा, आपली शाळा आणि आपलं बालपण विसरू, त्या दिवशी आपण स्वतःलाच हरवू. शेवटी मराठी शाळेबद्दल एवढेच म्हणावसं वाटतं की, धन्य ती मराठी शाळा जिने, इंग्रजी माध्यमाची फी भरणारे अनेक कार्यक्षम पालक घडवले.

मातीच्या कुशीतून उमललेली शाळा,
संस्कारांची दीपशिखा पेटवणारी,
अक्षरांतून स्वप्नं ओतताना,
बालपणाची नदी हळूच वाहणारी.
काळाच्या वाळवंटात हरवली तरी,
आठवणींत अजूनही श्वास घेणारी.

**कु. ममता गाकवाड**
द्वितीय वर्ष, समाजशास्त्र विभाग




सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित
श्रीमती. मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा
NAAC Reaccredited B++ (CGPA 2.88/4, Cycle III), Recipient of UGC-CPE Grant (2016-2021), Adjudged Best College (2017-2018) SNDT Women's University
मराठी विभाग आयोजित
शारदोत्सव व्याख्यानमाला २०२५ (वर्ष पाचवे)
नवदुर्गा : नवविचार - बहुआयामी स्त्री
२२ सप्टेंबर २०२५
पद्मश्री राव
जिजाबाई : स्वराज्य जननी राष्ट्रमाता
२३ सप्टेंबर २०२५
ॲड. सुरेखा भुजबळ
गंध सुरांचा ठाव स्त्रीमनाचा
२४ सप्टेंबर २०२५
मंजिरी देवरस
पु ल - सुनीताबाई सहजीवन
२५ सप्टेंबर २०२५
जयश्री चौधरी
स्त्रीचे समाजभान
२६ सप्टेंबर २०२५
डॉ. वृंदा कौजलगीकर
स्व-कथाकथन
२७ सप्टेंबर २०२५
वैशाली जाधव
कोसबाडच्या टेकडीवरून
२८ सप्टेंबर २०२५
डॉ. रिबेका दोडती
दातापासून दाताकडे
२९ सप्टेंबर २०२५
अश्विनी गाडगीळ
स्वयंसिद्धा
१ ऑक्टोबर २०२५
API गौरी जगताप - पाटील
स्त्री सुरक्षा आणि सायबर क्राईम
निमंत्रक
डॉ. अर्चना पत्की
प्राचार्य
आयोजक
डॉ. रश्मी शेट्ये तुपे
प्रा. माधवी पवार
श्रीमती परमेश्वरी देवी गोवर्धनदास गरोडिया एज्युकेशन कॉम्प्लेक्स ३३८, आर.ए. किडवाई रोड, माटुंगा मुंबई - ४०००१९

इतिहासाच्या अखंड प्रवाहात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात जी एकाच वेळी मातृत्व, संस्कार, नेतृत्व आणि दूरदृष्टी या सर्व गुणांचे मूर्तिमंत प्रतीक बनतात. मराठी इतिहासातील असेच एक तेजस्वी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे राजमाता जिजाबाईसाहेब भोसले. त्यांच्या कुशीतून भारताच्या इतिहासातील सर्वात महान राजपुरुष, छत्रपती शिवाजी महाराज, जन्मले. पण फक्त जन्म देणारी आई म्हणून नव्हे, तर विचारांनी, संस्कारांनी, शिक्षणाने आणि असीम प्रेरणेने "छत्रपती" घडविणारी माता म्हणून जिजाऊंचं स्थान अमर आहे.

जिजाबाईचा जन्म १२ जानेवारी १५९८ रोजी सिंदखेडराजा येथे झाला. त्या लखुजीराज जाधवराव यांच्या कन्या. त्या काळात महाराष्ट्रात परभूमीतून आलेल्या निजामशाही, आदिलशाही आणि मुघल सत्तेचे त्रिकोणी राजकारण चालू होते. अशा अस्थिर, असुरक्षित, पण सततच्या युद्धसदृश्य काळात जिजाबाईंचं बालपण मराठा सरदारांच्या कुटुंबात गेलं. घरात देशभक्ती, धर्मनिष्ठा आणि पराक्रम यांचा श्वासच घेतलेली जिजाबाई पुढे महापराक्रमी शहाजी राजे भोसले यांच्या पत्नी झाल्या. लग्न झाल्यानंतर थोड्याच वर्षांत त्यांना कळलं की शहाजी राजेंना वारंवार राज्यकारणाच्या गुंतागुंतीमुळे वेगवेगळ्या सुलतानांच्या सेवेत जावं लागतंय, त्यामुळे कुटुंब जीवनात स्थैर्य नव्हतं. पण हाच काळ जिजाबाईंना अधिक कठीण, अधिक सक्षम घडविणारा ठरला.

पुण्यातील शिवनेरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० (फाल्गुन वद्य तृतीया) रोजी जिजाबाईनी एका पुत्रास जन्म दिला – ते होते भविष्यातील स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज. त्या वेळी मुघल आक्रमणे वाढली होती, स्वहित व स्वार्थासाठी प्रजेवर अनन्वित अत्याचार होत होते, आणि हिंदुस्थानच्या भूमीत आपल्या धर्माची व राष्ट्राचे अस्तित्व साकारणारा कोणीच उरला नव्हता. पण जिजाबाईच्या मनात त्या वेळी एक महान विचार आकार घेत होता – "स्वराज्याचा ध्यास". त्या आपल्या बाळाला केवळ आपल्या कुटुंबाचा वारस म्हणून नव्हे, तर संपूर्ण जनतेचा तारणहार म्हणून घडवू लागल्या.शिवनेरीच्या कड्यांवर त्या लहान शिवबाला घेऊन फिरायच्या. बालमनात स्वराज्याचे बीज त्यांनी शिवबांच्या मनात पेरले. जिजाऊंनी रामायण, महाभारत, भागवत, चाणक्यनीती आणि धर्मशास्त्रातील कथा सांगतांनाच, यातून प्रेरणा घेऊन शिवबाच्या व्यक्तिमत्वास आकार देण्याचे महत्कार्य केले. या कथा फक्त ऐकविण्यासाठी नव्हत्या त्या म्हणजे संस्कारांचे जीवंत थडे होते.

जिजाबाईच्या जीवनात संयम आणि धैर्य दोन्हींचं अद्भुत मिश्रण होतं. शहाजी राजेंना राजकीय कारणास्तव बंगलोरला रहावं लागलं, तेव्हा जिजाबाई पुण्यात राहून आपल्या मुलाच्या शिक्षणाची, सैनिक प्रशिक्षणाची, आणि जनतेच्या देखरेखीची जबाबदारी स्वतः घेत होत्या. शिवबांचे शारीरिक आणि प्रशासनिक प्रशिक्षण सुरु असतांनाच त्यांच्या चारित्र्याचा आणि विचारांचा पाया ही त्यांनी भक्कम केला. त्या काळात स्त्रियांना राजकारणात स्थान नव्हतं, पण जिजाबाई याला अपवाद होत्या. पुणे, राजगड आणि नंतर रायगडच्या राजदरबारात त्यांनी दाखवलेली राजकारणातील परिपक्वता, निर्णयक्षमता आणि न्यायनिष्ठा यांची उदाहरणं असंख्य आहेत.

जिजाबाईच्या प्रेरणेनेच छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक समाज उद्धारक कार्य केली. स्त्रियांवरील अत्याचारांविरुद्ध कठोर कायदे, शेतकऱ्याला आणि कष्ट करणाऱ्यांना योग्य मोबदला, वतनदारांवर वचक, गुलामगिरीवर आळा हे सर्व संस्कार जिजाऊंच्याच कुशीत रुजलेले होते. राजमाता जिजाबाई केवळ एक आई नव्हत्या त्या राष्ट्राच्या मातेसारख्या होत्या. जेव्हा छत्रपती शिवाजी महाराजांचा रायगडावर राज्याभिषेक झाला (६ जून १६७४ ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी), तो जिजाऊंच्या स्वप्नांचा सुवर्णकळसच म्हणावा लागेल. त्यांचं संपूर्ण आयुष्य त्या एका क्षणासाठी होतं ज्या क्षणी त्यांचा पुत्र हिंदवी स्वराज्याचा अधिपती म्हणून ओळखला गेला आणि जीवनाचे सार्थक झालेली ही राष्ट्रमाता राज्याभिषेकानंतर फक्त काही दिवसांनी निधन पावली. जिजाबाईचं आयुष्य हे मातृत्वाचं सर्वोच्च रूप आहे जिथे आईचा ध्यास फक्त आपल्या लेकराचं वैभव नसून संपूर्ण समाजाचं कल्याण असतो त्याचवेळी राष्ट्रपुरुष जन्माला येऊन आकारही घेत असतात. जिजाऊंनी शिवबाला केवळ तलवार हातात घेणारा योद्धा बनवलं नाही, तर न्याय, धर्म, आणि लोकहित यांची कास धरणारा राजपुरुष म्हणून घडविलं. ''जर जिजाऊ नसत्या, तर छत्रपती शिवाजी महाराज घडले नसते'' एक आई म्हणून आजच्या आणि भविष्यातील प्रत्येक क्षणी जिजाऊंचे उदाहरण पालकांनी सदैव डोळ्यासमोर ठेवायला हवे.

आजच्या काळात जिजाबाईचा संदेश अधिक महत्त्वाचा वाटतो. त्यांनी आपल्या मुलाला शिकवलं की पराक्रम म्हणजे केवळ शत्रूवर विजय नव्हे, तर स्वतःच्या दुर्बलतेवर विजय मिळवणंही तितकंच आवश्यक आहे. म्हणूनच, पैसा, पद, प्रसिद्धी नव्हे तर विचारांची समृद्धी देणं हेच खरं पालकत्व आहे असे म्हणावे लागेल. राजमाता जिजाबाईचं जीवन म्हणजे मातृत्वाचं महाकाव्य आहे. त्या संस्कारांची निर्मिती करतात, आणि त्या संस्कारांमधून घडतात छत्रपती शिवाजी महाराजांसारखे पुत्र जे इतिहासाची दिशा बदलतात आणि उज्ज्वल भविष्याची नांदी करतात. त्यांच्या प्रेरणेतून फक्त महाराष्ट्रानेच नाही तर समस्त राष्ट्रानेच स्त्रीशक्ती, मातृत्व, आणि राष्ट्रभावनेचा एक अद्वितीय संगम समजून घेतला पाहिजे.जिजाऊसाहेबांनी दाखवलेला मार्ग म्हणजे राष्ट्रनिर्मितीच्या पवित्र कार्याचं आरंभस्थान आहे.



ePaper नवराष्ट्र Mumbai | 24 September 2025 | Page 2

# शारदोत्सवामध्ये जिजाईंचे विचार

## नवदुर्गा : नवविचार व्याख्यानमालेचे केलेय आयोजन

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. ेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी ंचालित श्रीमती एम. पी. शाह महिला हाविद्यालयात मराठी विभागात ारदोत्सव २०२५ नवदुर्गा : नवविचार ह्या व्याख्यानमालेच्या पहिले पुष्प जेजाबाई : स्वराज्य जननी राष्ट्रमाता ह्या वेषयावर व्याख्यानाचे आयोजन केले ोते. व्हॉईस कोच, लेखिका, इतिहास कथनकार श्रीमती पद्मश्री राव यांनी ावेळी विचार मांडले.

## विद्यार्थिनींच्या सृजनतेला मिळाली चालना

शारदोत्सवा निमित्ताने महाविद्यालयात विद्यार्थिनींसमोर राजमाता जिजाईंच्या नवविचारांचे तेजस्वी दर्शन घडविणे ही काळाची गरज आहे, असे उदगार व्हॉईस कोच, लेखिका, इतिहास कथनकार श्रीमती पद्मश्री राव यांनी काढले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अवनीश भट व कला शाखाप्रमुख डॉ.हिना शाह यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरूवात सहाय्यक प्रा.माधवी पवार यांच्या महालक्ष्मी अष्टकाने झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय कला शाखेतील अश्विनी चव्हाण, तर आभार प्रदर्शन संघमित्रा पडवणकर या विद्यार्थिनीं ओघवत्या शैलीत केले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, ग्रंथालयीन व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# गंध सुरांचा ठाव स्त्रीमनाचा

संगीत विशारद – ॲड.सौ. सुरेखा प्रशांत भुजबळ

नवरात्र म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नसून आजच्या स्त्रीसाठी स्वतःची ओळख, सामर्थ्य आणि संस्कृती जपण्याचा उत्सव आहे. आजची स्त्री म्हणजे देवीच्या रूपांचा आधुनिक आविष्कार आहे. तीच दुर्गा, तीच लक्ष्मी, आणि तीच सरस्वती!

स्त्रीमन हे नाजूक, संवेदनशील आणि गहन भावनांनी भरलेले असते. त्या मनाच्या कोपऱ्यात अनेक आठवणी, भावना, स्वप्ने आणि हुंकार दडलेले असतात. या भावविश्वाला शब्दांइतकेच गंध आणि सुर स्पर्श करतात म्हणूनच असे म्हटले जाते की गंध आणि सुरांना स्त्रीमनाचा ठाव घेता येतो. स्त्रीला समजून घेणं किंवा तिच्या मनात नेमकं काय चाललंय ? याचा ठाव घेणं ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. इतर कोणी आपल्याला समजून घेतंय की नाही; यापेक्षा प्रत्येक स्त्रीला स्वतःला काय वाटतं ? आपल्या मनात काय चाललंय ? मला काय हवंय ? मला काय करायचंय? आणि मी काय करू शकते ? माझ्यात कोणकोणत्या सुंदर गोष्टी आहेत? हे प्रत्येक स्त्रीला माहीत असायलाच हवं. स्वतःच्या कलागुणांना ओळखून, स्वतः मधल्या प्रतिभेला ओळखून स्वतःची आवड कशात आहे हे ओळखून प्रत्येक नारीने वाटचाल केली तर ध्येय हे आपलेच आहे आणि ध्येयपूर्ती होणे अवघड नाही; याची प्रचिती नक्कीच येऊ शकते. यासाठीच फक्त आपली सद्सदविवेक बुद्धि मात्र शाबूत असली पाहिजे.

गंध हा आठवणी जागवणारा अद्भुत घटक आहे. एखाद्या फुलाचा सुगंध, ओलसर मातीचा वास, स्वयंपाकघरातील मसाल्यांची खमंग दरवळ हे सारे स्त्रीमनाला मोहून घेणारे क्षण! बालपणी आईच्या पदराचा गंध, सणासुदीला घरभर दरवळणारा फराळाचा सुगंध, किंवा पहिल्या प्रेमाच्या भेटीत जाणवलेला हलकासा सुवास हे गंध स्त्रीमनात खोलवर रुजतात. कधी ते आनंद देतात, तर कधी हळवे करतात. पण खरंच संगीत हे मानवी आयुष्यात खूप महत्त्वाचे साधन आहे संगीताशिवाय आयुष्य निरस आहे. संगीत म्हणजे भावना व्यक्त करण्याचे माध्यम मनाला शांत करणे ची कला आणि संगीत ही भावनांची भाषा आहे संगीतामध्ये सुद्धा एकूण नऊ रस आहेत ज्यांची रचना नाट्यशास्त्र या ग्रंथामध्ये भरतमुनींनी केली आहे. जसे की शृंगार रस, करुण रस, रौद्र रस, वीर रस, बीभत्स रस, भयरस अद्भुत रस आणि शांत रस. हे नवरस केवळ मनोरंजन नाही तर मानवी भाव विश्वाचे आरसे आहेत जे दैनंदिन आयुष्यात आपण अनुभवतो. गायकाच्याआवाजातून, वादकांच्या सुरांतून जेव्हा हे नवरस उमलतात तेव्हाश्रोत्यांच्यामनाला जणू एका नव्या जगाची सफर घडते.

शृंगार प्रेमाचा, हास्य आनंदाचा,
करुण वेदनेचा, रौद्र संतापाचा,
वीर शौर्याचा, भयानक भयाचा,
बीभत्स घृणेचा, अद्भुत चमत्काराचा,
शांत समाधानाचा. हा नवरस आहे संगीताचा!

असंम्हणतात,
साहित्य,संगीत,कला विहीनः ,
साक्षात् पशुः पुच्छ विषाण हीनः ।
तृणं न खादन्नपि जीवमानः ,
तत् भागधेयं परमं पशूनाम् ।।

अर्थात संगीत, साहित्य, कला ही केवळ कला नाही तर मानवी आयुष्याची श्वासधार आहे. या कला मानवाच्या आयुष्यात नसतील तर त्याला पशूंचा दर्जा दिला जातो. नादब्रम्ह म्हणजेच परमेश्वर जिथे शब्द पुरे पडतात तिथे संगीत बोलते. संगीत ही आत्म्याची भाषा आहे. संगीत ही माणसाला एकत्र आणणारी जागतिक भाषा आहे. म्हणूनच संगीत केवळ मनोरंजन नसून आध्यात्मिक अनुभव आहे.

वेदकालीन काळामध्ये चार वेदांपैकी सामवेद हा संगीताशीच निगडित होता. नाट्यशास्त्रामध्ये भरतमुनींनी संगीताचे संपूर्ण विश्लेषण केले आहे. त्यानंतर संतांच्या काळात संत नामदेव,संत तुकाराम, संत एकनाथ, मीराबाई यांनी अभंग ओवी, भजन करून ही साहित्यकला वृद्धिंगत करत थेट लोकांच्या हृदयाशी जोडली. तसेच याच काळात राजाच्या दरबारात तानसेन, अमीर खुसरो,पुरंदरदासयांनी संगीत आणखी समृद्ध केले. कोणतीहीकला ही विकसनशील असते आणि कलेचा विकास कालानुरूप बदलणाऱ्या सामाजिक स्थितीवर अवलंबून असतो. कोणाला शास्त्रीय संगीत तर कोणाला नाट्यसंगीत आवडते, कोणी भावगीतांकडे आकर्षित होतो तर कोणी सिनेसंगीतात रमतो. मात्र शास्त्रीयसंगीत ऐकणारा गाणारा, व समजून घेणाऱ्यांची संख्या कमी होते आहे. कारण आपल्याला त्याच गोष्टीची आवड निर्माण होते जे आपल्याला समजते व येते.

गंमत म्हणजे जेव्हा एखादी स्त्री गर्भवती असते त्यावेळी आपलं मुल आणखी तेजस्वी व्हावं याकरिता ती, तिला कधीच न समजलेलं शास्त्रीय संगीत ऐकते, तानपुराचा आवाज ऐकते, संस्कृत श्लोक वाचते. कारण आपल्याला माहित आहे की, पाश्चिमात्य संगीत ऐकून आपलं बाळ तेजस्वी न होता हिंदुस्तानी भारतीय संगीता एकूण मात्र त्याचे गुण आणखी वाढीस लागतील. आणि हाच खरा संगीताचा गोडवा आहे. महत्त्वाची बाब म्हणजे संगीत थेरपी हा देखील आजच्या युगातला रुजलेला नवीन आणि शंभर टक्के प्रभावी असा उपचार आहे. हल्ली बऱ्याच लोकांची मानसिक स्थिती व शारीरिक तंदुरुस्ती करता म्युझिक थेरपी चा वापर केला जातो. रागधारी संगीताचा आपल्या जीवनावर अनन्यसाधारण असा प्रभाव पडतो.

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत ही आपल्या भारताचा वारसा आहे आणि हा वारसा टिकवण्याचा काम आपल्या सर्वांचे आहे. सगळ्याच गोष्टी आपण पाश्चात्त्यसंस्कृती मधल्या घ्यायला लागलो तर आपला वारसा आपण कसा टिकवणार? आपला भारत देश हा विविध संस्कृतींनी सणांनी नटलेला असा आहे. इतकं इंद्रधनुंप्रमाणे बनलेल आयुष्य केवळ भारतातच जगायला मिळतं त्यामुळे हा वारसा आपण जपायलाच हवा. स्त्री ही मुळातच हळवी, गोड, सुरेल आवाजाची, ममतेने भरलेली अशी कलाकृती आहे. त्याचप्रमाणे सुरांचे स्थानही स्त्रीमनात अनन्यसाधारण आहे.एखाद्यासंगीताचे सूर, भक्तिगीत, भावगीत किंवा आवडते गाणे स्त्रीमनाला शांत करते. दु:खाच्या क्षणी सूर अश्रू बनून वाहतात, तर आनंदाच्या क्षणी तेच सूर हास्याचे रूप घेतात. संगीत स्त्रीच्या भावनांना वाट करून देणारा सोपा मार्ग आहे. शब्द न बोलता सूर मनातील भावना व्यक्त करतात. बालपणीच्या अंगाईगीतापासून ते सणावारांपर्यंत स्त्रीच्या आयुष्यात स्वर रुजले आहेत.

पूर्वीच्या काळी कलाकार स्त्रियांना तितका मान नसला तरी आताच्या काळात अनेक कलांमध्ये स्त्रिया निपुण झालेले आहेत. वेगवेगळ्या 'शो'मधून स्त्रीला कलेकरिता वेगळे स्वातंत्र्य मिळते आणि मानसन्मानही मिळतोय. आधुनिक काळात स्त्री प्रत्येक क्षेत्रात अव्वल कामगिरी करत आहे. संगीत क्षेत्रात करिअर करण्याची उत्तम संधी मिळत आहे. मंचावर गायन-वादनाबरोबरच संगीत शिकवण, संशोधन करणं, म्युझिक थेरपी करणे अशा प्रकारे स्त्रियांना कलाक्षेत्रातही करिअरची उत्तम संधी मिळत आहे. स्त्रीचे आयुष्य अनेक भूमिका निभावत पुढे सरकत असते. मुलगी, बहीण, पत्नी, आई, मैत्रीण. या सर्व भूमिका निभावताना तिचे मन अनेकदा न बोलता सहन करते. अशा वेळी गंध आणि सुरच तिचे खरे साथी बनतात. एकाकी क्षणी आवडता संगीताचा गंध तिच्या मनाला आधार देतात, तिला नव्याने उभारी देतात. आजच्या धावपळीच्या जीवनात स्त्री स्वतंत्र, सक्षम झाली असली तरी तिच्या भावविश्वाची खोली तशीच आहे. अशा प्रकारे पाहता, गंध आणि सुर हे स्त्रीमनाचे अदृश्य भाष्यकार आहेत. ते तिच्या भावना समजून घेतात, तिच्या मनाचा ठाव घेतात. म्हणूनच "गंध सुरांचा ठाव स्त्रीमनाचा" हे विधान पूर्णतः सार्थ ठरते.



साप्ताहिक न्यूज मसाला

संपादक : नरेंद्र पाटील

Published : On Every Thursday

वर्ष : १३ वे । अंक : ३७ । दिनांक : २५ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर २०२५ पाने : ४ । किंमत ३ रुपये

## शारदोत्सवाच्या दुसऱ्या माळेत उलगडले स्त्रीमनाचे सप्तसुर

न्यूज मसाला : वृत्तसेवा, मुंबई
(गुरुदत्त वाकदेकर)

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती एम.पी.शाह महिला महाविद्यालयच्या मराठी विभागात शारदोत्सव व्याख्यानमाला २०२५ (वर्ष पाचवे) अंतर्गत ''नवदुर्गा : नवविचार-बहुआयामी स्त्री'' व्याख्यानमालेच्या दुसऱ्या पुष्पात विद्यार्थिनींसमोर ''गंध सुरांचा ठाव स्त्रीमनाचा'' ह्या विषयावर संस्कार प्रतिष्ठानच्या विश्वस्त व संगीत विशारद ड. सुरेखा भुजबळ यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

शारदोत्सवा निमित्ताने विद्यार्थिनींसमोर ह्या सुंदर विषयावर बोलण्याची संधी मिळाली. पाश्चिमात्य संगीताबरोबरच भारतीय शास्त्रीय व सुगम संगीत महत्त्वाचे आहे; कारण आपल्याला आपली परंपरा जोपासणे आणि वाढवणे आवश्यक आहे.''

महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी व्याख्यानमालेस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात सहा.प्रा. माधवी पवार यांच्या शारदास्तवनाने झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय कला शाखेतील प्राची रांगळे, परिचय सिद्धी मेमाणे, तर आभार प्रदर्शन कीर्ती नाटेकर यांनी ओघवत्या शैलीत केले.

पु ल आणि सुनीताबाई देशपांडे या जोडीबद्दल मराठी जनतेला विलक्षण आदर आणि कुतूहल आहे. पुलंची बहुआयामी प्रतिभा आणि अफाट लोकसंग्रह यांचा समतोल साधून त्यांच्याकडून आभाळाएवढा साहित्य संभार घडवण्याची विलक्षण किमया सुनीताबाईंनी करून दाखवली. तसे तर आपण सर्वांनी पु लं चे बरेच साहित्य वाचन केले आहे. त्यांना ऐकलेही आहे. पण तरीही त्यांचे नाव काढले तरी त्या अवलिया विषयीचा आदर आपल्याला त्यांच्याविषयी आणखी जाणून घेण्यासाठी चुंबकासारखा खेचून घेत असतो. शेवटी, 'ये दिल मांगे more." त्या दोहोंच्या सहजीवन पटाविषयी जाणून घेण्यासाठीचा हा आगळावेगळा कार्यक्रम 'पु ल आणि सुनीता बाई एक सहजीवन'

'पु. ल. देशपांडे' हे नाव नुसते उच्चारल्या बरोबर मराठी माणसांच्या चेहऱ्यावर आपोआप स्मित तरळते. त्यांचा सुनीताबाई यांच्या बरोबरचा सहजीवनाचा विषय ही केवळ वैयक्तिक कहाणी नाही तर तो मराठी संस्कृतीतील एका सुवर्णयुगाचा दस्तऐवज आहे . पु ल उर्फ भाई आणि सुनीता वहिनी हे दोघेही भिन्न स्वभावाचे होते. खुद्द भाईंच्या आईने आपल्या सुनेला सांगितले की, 'भाई हे रत्न आहे पण त्याला घडविणारी तूच आहेस.' सासूने सुनेला हे सांगणे म्हणजे पु लं च्या पाठी सुनीताबाई सावलीसारख्या किती भक्कम उभ्या होत्या हे वेगळे सांगणे न लगे. यातच त्यांच्या सहजीवनाचे सारे सार आले.

८० वर्षांपूर्वीची गोष्ट:पु ल शाळेत शिक्षक होते. त्याच शाळेत सुनीताबाईही रुजू झाल्या आणि कालांतराने त्यांचे धागेदोरे जुळले. पण ही गोष्ट अजून घरी सांगितली गेली नव्हती. सुनीताबाईंचे माहेरचे आडनाव ठाकूर. जेव्हा त्या आईशी याविषयावर संवाद साधू लागल्या तेव्हाचे संवाद, आजच्या सुधारक काळात कुठल्याही घरात लग्नाच्या मुलीबरोबर संवाद साधताना आईचे मन याच प्रश्न मंजुषाच्या भडिमारांच्या विचारात गुंतलेले दिसते.

उदा. कोणाशी ठरवलेस ? नाव, गाव काय ? गोरा आहे ? आपल्याच जातीतला आहे ना ? घरदार, नोकरी, व्यवसाय, शिक्षण, घरी कोण कोण असते? वगैरे वगैरे....

आई अगं तो, गौड सारस्वत ब्राह्मण आहे. देशपांडे आडनांव आहे. त्याचा पगार महिना रु.५५/- आणि माझा रु.३५/- ते गायनाच्या शिकवण्याही घेतात. असे सांगून आईला पटवत, शेवटी होकार मिळवून लग्न, अवांतर पैसे खर्च न करता, रत्नागिरीला नोंदणी पद्धतीने करण्याचे ठरले आणि १२ जून १९४६ रोजी लग्न लागल्यावर आयत्या वेळी पु लं ना गायला लावले की हो! आणि बिच्चारे ते गायलेही.

त्यानंतर, सुनीताबाईंनी संसारासाठी आयुष्यात शारीरिक आणि मानसिक स्वरूपाचे अपार कष्ट घेतले. म्हणून पु ल त्यांना म्हणायचे की, 'तू माझी प्रेयस आणि श्रेयस आहेस'. माझा गरिबीच्या संसाराचा वसा घेऊन तू घरात आलीस आणि दोघांचाही सांसारिक प्रवास सुखकारक केलास." १९५६ सालीची गोष्ट. 'तुझे आहे तुज पाशी' या नाटकाचे दोन अंक लिहून झाले होते. तिसरा अंक काही केल्या लिहायला घेईनात. ४-५ महिने गेले. ३ जुलै उजाडली. सुनीताबाईंचा वाढदिवस. पु लं नी विचारले आज काय गिफ्ट देऊ? सुनीताबाई म्हणाल्या मागेन ते देणार. ते म्हणाले दिले. मागच. त्या म्हणाल्या, 'तिसरा अंक पुरा करा' केला म्हणाले. खोलीत गेले. लिहायला बसले. बाईंनी दरवाजा बाहेरून लावून घेतला. त्यांच्या वाढदिवशी जीवाभावाची डहाणूकर नावाची मैत्रीण न चुकता यायचीच. मोठ्यांनी हसत खिदळत गप्पा मारणारी. ती येणार म्हणून सुनीताबाई दारातच ठाण मांडून बसल्या. ती आल्या आल्या तिला हाताची घडी तोंडावर बोट ठेवून तीन तास बसवून ठेवले. त्याही मौन व्रत घेतल्याप्रमाणे बसून राहिल्या. तीन तास झाले. आतून ठकठक झाले. सुनीताबाईंनी दरवाजा उघडला. त्यांनी पूर्ण नाटक सुनीताबाईंच्या हाती ठेवले आणि आनंदाला उधाण आले.

पु ल म्हणजे मराठी माणसाच्या जीवनात निखळ अखंड आनंदाचा ठेवा देणारे व्यक्तिमत्व. निखळ विनोद, उपहास, उपरोधात्मक जरी लिखाण केले तरी कोणालाही दुखावले जाणार नाही याची काळजी ते कटाक्षाने घेत. माणसांवर अतोनात प्रेम. निसर्ग हा मानवाशिवाय अपूर्ण आहे यावर त्यांचा ठाम विश्वास. वाहत्या पाण्याला जसे कालवे काढून विभागातात तसे सुनीताबाईंनी, पु लं चे साहित्य अनेकविध पैलूंनी वेगवेगळे केले. त्यांच्यामधील कलाकाराला खुलवले. कायम प्रोत्साहित केले. त्याही स्वतः उत्तम लेखिका होत्या. त्यांनी आपल्या विचारांशी, मूल्यांशी कधीच तडजोड केली नाही.

पु लं नी, बाबा आमटे बरोबर काही वेळ घालविला, भूदान चळवळीत भाग घेतला. रवींद्र नाथ टागोरांच्या साहित्याविषयी त्यांना प्रचंड आदर आणि प्रेम. त्यासाठी त्यांनी वयाच्या ५० व्या वर्षी कलकत्त्यात जाऊन, तिथे राहून, भाषा आत्मसात करून, टागोरांचे साहित्य मराठीत प्रसिद्ध केले. किती ही जीवनातील कमिटमेंट. ते जरी विसरभोळे असले तरी perfectionist सुनीताबाईंनी त्यांना शिस्त लावली. सत्कार्यासाठी उभयतांनी गाजावाजा न करता दान दिले. पु लं चा ५० व्या वाढदिवस त्यांनी अंधांच्या ब्रेल लिपीसाठी निधी देत साधेपणाने साजरा केला. सुनीताबाई, संपूर्ण आर्थिक व्यवहार पहात. फार चिकित्सक होत्या. आग्रही, निर्णयात फेरफार न करणाऱ्या. वेळ काटेकोरपणे पाळणाऱ्या. पु लं ना भेटायचे तर यांच्याकरवी वेळ निश्चिती करून घ्यायची. मागितला तेवढाच वेळ त्यांना द्यायच्या.

दोघांनी मिळून भरपूर प्रवास केला. प्रत्येक कार्यक्रमाला त्या साथ द्यायच्या. नंतर त्यांनी ती तिकीट आरक्षणाची भानगड नको म्हणून चार चाकी वाहन घेतले. वाहन चालविणे शिकल्या आणि त्या नकाशाशिवाय कुठे कुठे भाईंना घेऊन जायच्या. भाई हे त्यांचे सर्वस्व होते. नंतर नंतर त्यांनी केवळ आपल्या अज्ञानाचा गैरफायदा इतरांनी उठवू नये म्हणून ट्रस्ट डीडचा अभ्यास केला. देणग्यांचे वाटप कसे केल्याने काय कर आकारणी असते याचाही अभ्यास केला. भाईंचे वेळापत्रक जपले. त्यांना प्राधान्य देत स्वतःला मागे ठेवले. त्यांच्या निर्णयावर भाई विसंबून असायचे. त्यांनी कधीच सुनीताबाईंना प्रश्नार्थी विचारले नाही. पूर्ण स्वातंत्र्य दिले. कुठल्याही गोष्टींना विरोध केला नाही. आणि म्हणूनच पुढल्या जन्मी मला हाच नवरा मिळावा अशी ते देवाकडे मागणी करत. भाई अगदी ४ मिनिटांच्या आकाशवाणीवरील भाषणाला जायचे असेल तरी अभ्यास करून, आरशासमोर तालीमकरून मगच कार्यक्रम स्थळी पोहचायचे.

पु ल खवय्ये. कोणाचे ना कोणाचे खाऊचे डबे यायचे. डब्यावर कधी नावे असायची तर कधी वाचता येणार नाहीत अशी पुसट असायची तर कधी नावेच नसायची. डबे परत देताना पंचाईत होऊ नये म्हणून त्या डब्यातील खाऊ आपल्या डब्यात काढून घ्यायच्या, डबा घासून पुसून स्वच्छ करायच्या आणि डब्यात त्या माणसाच्या नावाची चिठ्ठी लिहून ठेवायच्या. दोन चार दिवसांनी घरी काही पदार्थ बनला की, त्या त्या डब्यात तो पदार्थ भरून त्या त्या चिठ्ठकांप्रमाणे डबे घर पोच व्हायचे. पु.लं. व सुनीताबाई या अगदी भिन्न प्रवृत्तीच्या व्यक्ती. पु.लं. ना माणसांची, लिखाणाची, संगीताची, नाटकांची आवड पण शिस्त नाही. तर सुनीताबाई यांना या सर्वांची आवड पण ह्या गोष्टी अतिशय शिस्त शीर असायलाच हव्यात हा त्यांचा आग्रह. अर्थात पु.लं. वाहावत गेले नाहीत याचे एकमेव कारण म्हणजे सुनीताबाई. पु.लं.ना याची पुरेपूर जाणीव होती व म्हणूनच ते गंमतीने म्हणायचे आमचे लग्न पत्रिके प्रमाणे ३६ गुण जुळले आहेत. त्यातील ३५ सुनीताचे व १ माझा.

'बटाट्याची चाळ' या कार्यक्रमाचे प्रयोग जोरात सुरु होते. त्याचा ५0 वा प्रयोग झाल्या बरोबर सुनीताबाई यांनी पु.लं. ना सांगितले यानंतर या कार्यक्रमाचे प्रयोग बंद कर कारण नाही तर तू यातच अडकून पडशील. नवीन काही तरी लिही. 'बटाट्याची चाळ'चे प्रयोग बंद केल्यामुळेच पुढे 'वाऱ्यावरची वरात' हे नाटक पु.लं. नी लिहिले व त्याचे ही अनेक प्रयोग केले. पु.लं. च्या कुठल्याही लिखाणाच्या पहिल्या वाचक सुनीताबाई असतं व पु.लं. ची कुठलीही निर्मिती ही सर्वोत्कृष्टच असायला हवी हा त्यांचा मनस्वी आग्रह असायचा व त्याकरिता पु.लं. ना त्या सतत प्रत्येक लिखाण सर्वोत्तम होईपर्यंत मेहनत घ्यायला लावीत असतं. त्या म्हणत भाई जातिवंत कलावंत आहे त्याने आपल्या साहित्यातून वाचकाना आनंद द्यावा बाकी कुठल्या गोष्टीत वेळ घालवू नये,सगळी कामं मी करीन तू फक्त लिही.

म्हणूनच 'बटाट्याची चाळ' , 'व्यक्ति आणि वल्ली', 'हसवणूक', 'गोळाबेरीज', 'एक शून्य बाजीराव', 'सुंदर मी होणार' , 'तुका म्हणे आता' असे अफाट साहित्य निर्माण झाले . पु.ल. व सुनीताबाई यांच्यात कुठल्याही नवरा-बायको यांच्यात उडतात तसे खटके उडत असतं व अबोला ही धरला जात असे पण अबोला मिटवण्याची त्यांची पध्दत मात्र फारच वेगळी होती व ती म्हणजे एकाने कविता म्हणायला सुरुवात करायची. दोघांच्याही शेकडो कविता मुखोद्गत होत्या त्यामुळे एका मागून एक कविता म्हणतं त्यांच्यातील अबोला संपत असे.

पु.ल. देशपांडे यांनी ६५ हजार पत्र लिहिली आहेत कारण वाचकांच्या पत्राला उत्तर दिलेच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष होता. पु.ल व सुनीताबाई या दोन प्रवाहांचा संगम म्हणजे 'तो शब्दांनी रंगवतो, ती त्या शब्दांना अर्थ देते' या वाक्यात त्यांच्या नात्याचं सार सांगता येईल. त्यांना जाणून घेणेम्हणजे, या दोघांच्या सृजनशील सहजीवनाचा उत्सव आहे. जेव्हा पु.ल 'बटाट्याची चाळ' लिहितात, तेव्हा त्यात सुनीताबाईंच्या निरीक्षणशक्तीचा गंध आहे हे जाणवतं. आणि सुनीताबाई जेव्हा "आहे मनोहर तरी" लिहितात, तेव्हा ते तिचं आत्मवृत्त असूनही त्यात पु. लच्या प्रसन्न नजरेचा प्रत्यय दिसतो. पु. ल कुणावर हसत नाहीत, ते माणसांसोबत हसतात. त्यांच्या विनोदात टवाळी नाही; त्यात प्रचंड माणुसकी आहे. 'हास्य हा त्यांच्यासाठी जगण्याच्या तत्त्वज्ञानाचा भाग होता'

त्यांचे सहजीवन "आदरयुक्त स्वातंत्र्य" या सूत्रावर टिकलेले होते. हिच त्यांच्या सहजीवनाची खरी ताकद.सुनीताबाईंच पु लं वर स्वतः हून अधिक प्रेम होतं त्यांची ही आठवण बघा 'जिन्यात अनेक लोकांची जा-ये चालू असताना पु लंच्या पावलांची चाहूल मला अचूक लागते आणि तो बेल वाजवण्यापूर्वी मी दाराशी येते. तो काही मुलखावेगळी पावलं टाकत मुळीच येत नाही. अगदी चारचौघांसारखाच चालतो. पण हेही केवळ सवयीनं असू शकेल. इतकंच नव्हे, तर आता विषय निघालाच आहे तर तुम्हांला आणखी एक गोष्ट सांगून टाकते. फार वर्षांपूर्वी, पुलचित्रपटांचं संगीत-दिग्दर्शन करत असे. रेकॉर्डिंग आणि विशेषत पार्श्व संगीत हे रात्रीचंच असे. साधारणतः रात्री नऊ नंतर काम सुरू होई आणि अपरात्री केव्हाही पुल घरी परते. मी रात्री साधारणतः एकदीडच्या सुमाराला सैपाकाला सुरुवात करत असे आणि सर्व कामं आटोपून मग तो येईपर्यंत काही तरी घरकाम करत त्याची वाट पाहत बसत असे. त्या वेळी पुण्यात एस पी कॉलेज जवळ ग० वि० केतकरांच्या बंगल्यात आम्ही तिसऱ्या मजल्यावर राहत असू. रात्रीच्या वेळी रस्त्यावरून अधूनमधून वाहनं जातच असत. पुलला घरी आणून सोडणारी गाडी काही खास नसेकिंवा एकच नसे. वेगवेगळ्या कंपन्यांच्या वेगवेगळ्या आणि सर्वसाधारण गाड्याच असत. पण पुलला आणून सोडणारी गाडी आली हे नेमकं मला त्या गाडीचा आवाज येण्यापूर्वीच (हॉर्न नव्हे, इंजिनचाच) कळत असे'

आजच्या शहरी जीवनात जिथं नाती क्षणिक होत चालली आहेत, पु. ल. आणि सुनीताबाईंचं सहजीवन आदर्श म्हणून उभं राहित . तेढा है पर मेरा है असे प्रेम होते दोघांचे. पु ल ना दोन शब्द फार आवडायचे दाद आणि दान.


चेंबूर वेलफेअर • लेखिका मंजिरी टेवरस यांचे व्याख्यान संपन्न

पु ल आणि सुनीताबाई सहजीवन

महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्त्व पु ल!

# स्त्रीचे समाजभान

समाजसेविका,लेखिका –जयश्री चौधरी

स्त्रीचे समाजभान या थोडयाशा क्लिष्ट वाटणाऱ्या विषयाला हात घालण्यापूर्वी मी सातारा येथे इयत्ता नववीत असताना घडलेल्या त्या प्रसंगाची तुमच्यासमोर उजळणी करणार आहे. आम्हा आठ एक मुलींचा वाद्यवृंद मंचावर तयार होऊन फक्त पडदा वर जाण्याची वाट पाहत होतो आणि... पडदा वर गेला....मात्र मी प्रेक्षकांमध्ये पहिल्याच रांगेत बसलेल्या त्या थोर, ऋषितुल्य महनीय व्यक्तीच्या दर्शनाने माझे भानच विसरले. समोर विराजमान झाले होते आमच्या सातारा कन्या शाळेचे सर्वेसर्वा १०३ वर्ष वयाचे भारतरत्नमहर्षी धोंडो केशव कर्वे.

मी स्वतःलाच विसरले होते. भान म्हणजे ज़ान,बोध, स्मृती, लक्ष,आठवण, जाणीव संदर्भानुसार योग्य ठिकाणी योग्य पर्याय वापरावा लागतो. स्त्रीचे समाजभान याचा अर्थ समाजाप्रती स्त्रीची असणारी जाणीव असा होतो. आज आपण २१व्या शतकात पदार्पण केले आहे त्यामुळे आता स्त्रियांच्या कर्तव्यांकडे केवळ पारंपारिक भूमिकेतून न पाहता तिच्या कर्तृत्वाचे क्षितिज किती विस्तारले आहे हे देखील आपल्याला पाहायला हवे. आजच्या स्त्रीला नक्कीच चांगलेच समाजभान आले आहे. समाजम्हणजे समुदाय, जमाव, सभा,मंडळी, असे शब्दकोशात त्याचे अर्थ दिलेले आहेत. परंतु समाज म्हणजे केवळ लोकांचा समूह नाही. त्याचा व्यापक अर्थ आपण लक्षात घेतला पाहिजे. समाज म्हणजे समान कायदे, संस्कृती आणि उद्दिष्टे असणाऱ्या लोकांचा संघटित गट.

महात्मा फुले यांच्या मते समाजात सर्वांनाच शिक्षण आणि समान संधी मिळणे आवश्यक आहे. तर महात्मा गांधींच्या मते समाजाचे आदर्श स्वरूप म्हणजे सर्वोदय. सर्वांचा उदय. समाजाचे भान असणारी व्यक्तीच समाजाला प्रगतीपथाकडे नेत असते. प्रबोधन काळात स्त्रियांच्या समाजाप्रती जाणीवा हळूहळू जागृत होऊ लागल्या होत्या.त्यात प्रामुख्याने आपल्या स्त्रीशिक्षणाचा वसा घेणाऱ्या सावित्रीबाई फुले,पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे,रमाबाई रानडे यांच्यासारख्या अनेक समाज सुधारक स्त्रियांची नावे घ्यावी लागतील. सावित्रीबाई बद्दल म्हणता येईल,

सावित्री ही जिज़ासू
सखी,गुणी जिगिशू
पती ज्योती गणेशु
दिव्यशक्ती.

सावित्रीबाईंचे योगदान जाणून आज आपण सावित्रीच्या लेकीनी त्यांना शब्द दिला पाहिजे .

देतो तुज वचन
विद्या आम्हासी धन
मुक्तपणे वाटेन
सारे ज़ान.

ही वचनबद्धता म्हणजेच स्त्रीला असणारे समाजभान. सावित्रीबाईंचा काळ लोटून आज जवळजवळ १२८ वर्षे झाली आहेत. या शतकोत्तर प्रवासात निश्चितच आजची स्त्री सजग आणि अधिक सुजाण झाली असून प्रगतीच्या दिशेने तिची वाटचाल सुरू झाली आहे. आजच्या काळातील अशा अनेक सुजाण आणि कर्तृत्ववान स्त्रियांचे दाखले देता येतील परंतु येथे प्रतिकूल परिस्थितीतही सामाजिक कार्याची जाणीव ठेवून समाजातील वंचित घटकांसाठी अथक परिश्रम करणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांचे जरूर स्मरण करावे

'अनाथांची आई' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताईंनी १,५०० पेक्षाही अधिक अनाथ मुलांचे संगोपन केले त्यांना शिक्षण देऊन त्यांच्या पायावर उभे राहण्यास मदत केली. सिंधुताईंचे वाणीवर प्रचंड प्रभुत्व होत. अत्यंत साधी राहणी असणाऱ्या या माऊलीने वृद्धाश्रमांसारख्या अनेक संस्थांना देखील मदतीचा हात दिला आहे. आज नवविचारांनी प्रेरित होऊन नवदुर्गेप्रमाणे तळपत असणाऱ्या तेवढेच विलक्षण समाजभान असलेल्या अनेक स्त्रिया आपल्या आजूबाजूला दिसून येतात.

ज्ञानेश्वरांनी विश्व कल्याणासाठी पसायदान मागितले होते तर ध्येयपूर्तीसाठी या महिला असेही दान मागत असतील.

आयुष्याचे थोडे दान दे
आत ऐकणारा कान दे
करण्यासाठी खूप कष्ट
जगण्याचे मला भान दे.

जग बदलत असतानाच आजच्या स्त्रीला अनेक क्षितिजे खुणावत आहेत. एकेकाळी चूल आणि मूल एवढेच स्त्रीचे कार्यक्षेत्र समजले जाई. Woman for the needle and man for the field असे पाश्चात्य देशातही स्त्रीचे वर्णन केले जाई. पण आज उंबरठ्याच्या बाहेर पाऊल टाकणाऱ्या स्त्रीच्या सामाजिक, राजकीय,संस्कृतीक आणि नैतिक जाणिवा जागृत झाल्या आहेत.राजकारणात ती सक्रिय होताना दिसते. सांस्कृतिक क्षेत्रात ती नेहमीच आघाडीवर होती. नैतिक मूल्यांचे बीज ती घरातच रुजवत असते. समाजापासून वेगळे होऊन माणूस एकटा आयुष्य काढू शकत नाही. समाजात राहूनच त्याची प्रगती शक्य असते. समाजाचा घटक बनून Give and take हा मंत्र सर्वांनाच आत्मसात करावा लागतो.याची जाणीव तिला पदोपदी होते.

आजची तरुण पिढी जेन झी किंवा झुमर्स म्हणून ओळखली जाते.डिजिटल युगात जन्मलेल्या या पिढीसमोर सारी समाजमाध्यमे हात जोडून सेवा देण्यासाठी सज्ज आहेत. अशातही आजच्या मुली आणि स्त्रिया यांना सामाजिक बदलांची जाणीव आहे. चांगले आणि वाईट याची त्यांना बरीच समज आहे. पर्यावरणाचा विषय किती गंभीर झाला आहे याचीही त्यांना कल्पना आहे तरीही नकळत कधीतरी पर्यावरणाची पायमल्ली होते.ये दिल मांगे मोर किंवा युज अँड थ्रोच्या जमान्यात पर्यावरणाची हानी होऊ शकते. यासाठीच महिलांना काही गोष्टी आत्मसात कराव्या लागणार आहेत. काही मूल्यांची वेळोवेळी उजळणी करावी लागेल. त्यांना आपण सेव्हन गोल्डन रुल्स ऑफ विक 7 golden rules of the week म्हणायला हरकत नाही. Charity begins at home असे म्हटले जाते.

घरापासून सुरुवात करून समाजात आपल्याला ही मूल्ये नक्कीच प्रवाहित करता येतील. वारांच्या अद्याक्षरानुसार आपण ते लक्षात ठेऊया.

·सोमवार : सोबतीची आपणास गरज असते. ही जाणीव ठेऊन एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ. असे चलन राखावे.

·मंगळवार : समाजाचे मंगल चिंतणे. वेळोवेळी समाज ऋण फेडणे.

·बुधवार : बुद्धिमत्तेचा विकास करणे. यासाठी वाचाल तर वाचाल ही उक्ती जाणून उत्तम उपल असणारे वाङ्मय, वृत्तपत्रे यांचे वाचन करणे. प्रसंगी लिहीतही जाणे. रोजनिशी लिहिण्याचा परिपाठ ठेवणे.

·गुरुवार : योग्य गुरु करणे. निसर्गा अवघा गुरुसमान मानल्यास निसर्गाकडून आणि इतरांकडूनही काही ना काही शिकता येतेच.

·शुक्रवार : शुचिता. वागण्यात आणि विचारात देखील शुद्ध भाव असणे गरजेचे असते.

·शनिवार : शक्तीची उपासना अथवा जोपासना करावी. आपण अबला नसून सबला आहोत याचे सतत भान ठेवावे. नवदुर्गेचेच पूजन होत असते. नवदुर्गांकडून आपणास काय शिकता येईल याचा अभ्यास करावा.

·रविवार : रचनात्मक कार्य स्त्रियाच अधिक उत्तम करू शकतात तूच हो (होऊ शकतेस) तुझ्या आयुष्याची शिल्पकार हे ही लक्षात ठेवणे.

आजकाल होणाऱ्या विश्वसुंदरी स्पर्धेत स्त्रियांचे केवळ कायिक सौंदर्य लक्षात न घेता तिच्या बौद्धिक क्षमतेची उंची आणि खोली मापली जाते. A thing of beauty Is a joy for ever असे John Keats या आंग्लकवीने म्हटले आहे

But,

Beauty lies in what you think

Beauty lies in what you do.

उत्तम समाज भान असणारी स्त्रीच एक उत्तम समाज घडवू शकते.



शारदोत्सव व्याख्यान ● सजग सृजाण, प्रगतीवादी समाजभान

## चौथ्या माळेत 'स्त्रीचे समाजभान'

▸ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव व्याख्यानमाला २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवविचार- बहुआयामी स्त्री' पुष्प चौथे 'स्त्रीचे समाजभान' या विषयावर लेखिका, ज्येष्ठ समाजसेविका जयश्री चौधरी यांचे व्याख्यान झाले.

या व्याख्यानात 'स्त्री म्हणजे केवळ कुटुंबाची जबाबदारी पार पाडत नाही, तर ती समाजरचनेतील एक सक्षम आणि सजग घटक आहे. स्त्रीचे समाजभान म्हणजे स्त्रीने स्वतःभोवती असलेल्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि नैतिक जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवणे व त्यानुसार कृती करणे.

### समाज अधिक सुजाण बनतो

स्त्रीचे समाजभान हे केवळ तिच्या व्यक्तिगत प्रगतीपुरते मर्यादित नाही, तर ते संपूर्ण समाजाच्या आरोग्याशी, प्रगतीशी आणि समतेशी निगडीत आहे. स्त्री जेव्हा सजग होते, तेव्हा संपूर्ण समाज अधिक सुजाण, समतावादी आणि प्रगतिशील बनतो.' असे मत ज्येष्ठ समाजसेविका जयश्री चौधरी यांनी विद्यार्थिनी समोर मांडले. शारदोत्सव २०२५ या सलग नऊ दिवस चालणाऱ्या व्याख्यानालेस महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी शुभेच्छा दिल्या.

### राष्ट्र स्वच्छता अभियानाची घेतली प्रतिज्ञा

● कार्यक्रमाची सुरुवात एकात्म मानववादाचे प्रणेते पंडीत दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्र स्वच्छता अभियान यावर प्रतिज्ञा घेऊन करण्यात आली.

● सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनाली मणचेकर,परिचय प्राची गुढेकर आणि आभार प्रदर्शन दीक्षा घनदट्टे या विद्यार्थिनींनी सुसंगतपणे केले. या कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

# स्वकथाकथन

लेखिका-डॉ.वृंदा कौजलगीकर डोंबिवली

आज आपण कथा लेखनाबद्दल थोडसे जाणून घेऊया.आपल्याकडे इंग्रजी आमदानीच्या आधी जे साहित्यप्रकार होते, त्यात कथा प्रामुख्याने होती. महानुभावांचे संस्थापक चक्रधर स्वामी यांनी आपल्या शिष्यांना काऊ चिऊची गोष्ट सांगितल्याचे उल्लेख आहेत. म्हणजे कथा ही तेराव्या शतकापासून होती. अजूनही कथेचे गारुड उतरलेले नाही. हल्ली धक्काधक्कीच्या काळात पटकन वाचून होणारे असे काही हवे असते. म्हणून कादंबरी, चरित्र, आत्मचरित्रापेक्षा कथा वाचणे रसिक पसंत करतात. छोट्या मुलांनाही अजून कथेचे आकर्षण आहे. आजीबाईंना नातवंडासाठी गोष्टी तयार ठेवाव्या लागतात.

कथानक ,व्यक्तीचित्रण, घटना, प्रसंग ,वातावरण ,संघर्ष  संवाद , वर्णन, निवेदन भाषाशैली ही कथेची प्रमुख अंगे आहेत.ओ हेनरीचे तंत्र कथे संदर्भात प्रसिद्ध आहे. कमीत कमी पात्र, कमीत कमी घटना प्रसंगातून ती फुलवता आली पाहिजे. आरंभ ,मध्य, शेवट या भागात ती विभागलेली असते. शेवट कलाटणी देणारा हवा. संघर्ष गुंतागुंतीचा, कळस गाठणारा. पण शेवटी सर्व गुंता सुटलेला असावा. शेवट प्रेक्षकांच्यावरती सोपावावा. कोणी किती ही मार्गदर्शन केले तरी, तंत्र सांगितले तरी ,हाडाचा कथाकार ही सर्व तंत्रे मोडीत काढून स्वतःचे स्वतंत्र तंत्र बनवतो. पुढे तेच रुढ होते.

कथा सुचते कशी? रस्त्याने जाताना एखादा अपघात घडतो. तो अनेक जण पाहतात.अगदी इतरांना बाजूला सारून पुढे पुढे जाऊन पाहतात. दोन दिवसांनी तो आपण विसरून ही जातो. पुन्हा कधीही असा प्रसंग दृष्टीस पडला तर आपल्याला या जुन्या प्रसंगाची आठवण येते इतकेच. पण एखादा चित्रकार कलावंत ते दृष्य पाहतो, त्यावरून चित्र काढतो. ते पाहून आपण आनंदीत होतो. "किती बारीक सारीक तपशीलासह काढले आहे. अगदी जिवंत केले आहे." असे म्हणून कौतुक ही करतो. तेच दृश्य एखादा कवी पाहतो. त्यावर कविता करतो. तिचे ही आपण असेच कौतुक करतो. एखादा लेखक ही ते पाहतो.त्यातून कथाबीज त्याच्या मनात पडते. ते त्याला स्वस्थ बसू देत नाही.ते बीज अंकुरायला लागते. ते व्यक्त करावे अशी त्याला निकड वाटते. मग कल्पनेचे रंग भरून तो कथेतले काही घटक तयार करतो. व्यक्तीचित्रांची मदत घेतो.ती व्यक्ती, तिचे कुटुंबीय इत्यादी साकार करतो. कथानक तयार करतो. त्यात संवाद, संघर्ष, वातावरण, घटना, प्रसंग यांची गुंफण करतो. निवेदनाच्या माध्यमातून आपल्या खास भाषाशैलीत तो त्या लिहितो. आणि एक सुंदर कथा तयार होते.

अशी कथाबीजे रोजच्या जीवनात, व्यवहारात कितीतरी मिळत जातात. फक्त कान आणि डोळे उघडे ठेवावे लागतात.निरीक्षण शक्ती चांगली लागते .संवादनशीलता जागृत ठेवावी लागते. कल्पनेच्या भराऱ्या माराव्या लागतात. या सर्व गोष्टी कलाकाराकडे उपजत असतात.काही जण त्या प्रयत्न साध्य करतात. प्रतिभेचा परिसर स्पर्श ज्याला लाभलेला असतो तो थोर लेखक होतो. समाजात मान्यता पावतो.ही एक साधन आहे.तपश्चर्या आहे. अशा अनेक आशयाच्या कथा आज वाचायला मिळतात. दिवाळी अंक, कथांची पुस्तके, स्पर्धेसाठी मागवण्यात येणाऱ्या कथा. या कथेतून कथाकथनासाठी कथा निवडता येतात.स्वतः लिहिता येतात. आज कथा दालन खूप समृद्ध आहे. ते लोकांच्या पर्यंत पोहोचवण्याचे साधन कथाकथन आहे.स्वतः वाचण्यापेक्षा लोकांना ते ऐकायला आवडते, म्हणून कथाकथनाचे कार्यक्रम रंगतात



सांध्य दैनिक

# आपलं वर्धा

RNI.No. MAHBIL/2023/85939
POSTL No. G/WRD/138/2024 - 27

•वर्धा •वर्ष : ०२ •अंक : २५७ • पृष्ठे : ६ रविवार - दि. २८ सप्टेंबर २०२५ मूल्य : १ रू. •कार्यकारी संपादक - वैदांत प्रफुल्ल भटकर

## स्त्री सृजनतेच्या स्व-कथाकथनाने शारदोत्सवात उमटविला ठसा

### डॉ. कौजलगीकर यांच्या कथा विद्यार्थिनींसाठी प्रेरणादायी ठरल्या

मुंबई (गुरुदत्त वाकदेकर)

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती एम.पी. शाह महिला महाविद्यालयाच्या मराठी विभागात शारदोत्सव २०२५ (पाचवे वर्ष) अंतर्गत 'नवदुर्गा : नवविचार' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानमालेत पाचवे पुष्प म्हणून 'स्व-कथाकथन' या विषयावर व्याख्यात्या, लेखिका आणि कथाकथनकार डॉ. वृंदा कौजलगीकर यांनी व्याख्यान सादर केले. कार्यक्रमास विद्यार्थिनींसह प्राध्यापकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्त्री उपजतच सृजनशील असून तिचं योगदान केवळ कुटुंबापुरतं मर्यादित न राहता साहित्य, कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रात ठसा उमटवते, असे त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. कौजलगीकर म्हणाल्या, "स्व-कथाकथन म्हणजे स्त्रीने स्वतःच्या अनुभवांवर, भावविश्वावर, संघर्षावर व आत्मशोधावर आधारित कथन सादर करणे. हे केवळ आत्मकथन नसून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा, विचारांचा आणि सामाजिक स्थितीचा आरसा ठरतो." त्यांनी सांगितले की स्त्रीच्या अनुभवातून समाजासही संदेश मिळतो आणि तिच्या जीवनातील कथा



त्यांनी समाजातील स्त्रीच्या विविध भूमिकांवर आणि सृजनशीलतेवरही प्रकाश टाकला.

व्याख्यानादरम्यान डॉ. कौजलगीकर यांनी काही गंभीर आशयाच्या तर काही विनोदी रंगाच्या कथा सादर केल्या. त्यांच्या कथांमधून स्त्रीच्या संघर्षाचे, आनंदाचे आणि भावनांचे सूक्ष्म दर्शन घडले. प्रेक्षकांनी त्यांच्या कथांचा उत्साहाने आनंद घेतला. एका विद्यार्थिनीने सांगितले, "डॉ. कौजलगीकर यांच्या कथांमधून स्त्रीच्या जीवनातील विविध पैलू समजून घेता आले." या कथांनी उपस्थितांना विचार करण्यास प्रवृत्त केले आणि

केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्ष कला शाखेतील दिशा जाधव हिने केले. कनिष्ठ महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. नेहा भोसले यांनी प्रमुख व्याख्यात्यांचा परिचय करून दिला, तर यस्तरा मान हिने आभार प्रदर्शन केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थिनींना सृजनशील अभिव्यक्तीला वाव मिळतो तसेच समाजातील स्त्रीच्या बहुआयामी योगदानाची जाणीव होते. शारदोत्सव सारख्या कार्यक्रमांनी साहित्य, कला आणि विचारांना नवी दिशा मिळवून दिली, असा सूर उपस्थितांनी नोंदविला.

समाजसेविका- वैशाली जाधव

ज्या परिसरात पाळणाघरे, बालवाड्या, पूर्वप्राथमिक शाळा, बालसेविका प्रशिक्षण वर्ग, अंगणवाडी प्रशिक्षणवर्ग, अध्यापक प्रशिक्षण विद्यालय, कार्यानुभव प्रकल्प, उद्योगप्रशिक्षण, स्त्रीशक्ती जागृती संस्था, ठाणे, रात्रशाळा, प्रौढशिक्षण संस्था, कुरणशाळा, मूकबधिर संस्था, डहाणू, आरोग्यकेंद्रे अशा संस्था स्थापन केल्या गेल्या. या परिसरातील उपल नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून त्यांनी मुलांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न केला तो कोसबाडच्या टेकडीवरचा "विकासवाडी प्रकल्प" अनेकांना या नावाने नव्हे तर 'अनुताई वाघ याच विद्यालय' किंवा अनुताई वाघांची कोसबाडची टेकडी याच नावाने प्रसिद्ध आहे.

त्याच कारण असं की, पुण्यात जन्म झालेल्या पण नंतर बोर्डी कोसबाड या पालघर जिल्ह्याच्या भागातच स्वतःच संपूर्ण आयुष्य व्यतीत केलेल्या अनुताई वाघ. त्यांनी शिक्षणाद्वारे आदिवासींच्या जीवनात जागृती निर्माण करण्याचे काम केले. अनुताईंना वयाच्या तेराव्या वर्षी वैधव्य आलं पण तत्कालीन सामाजिक रूढींचे बंधन झुगारून त्यांनी शिक्षण घेतले व शिक्षिका म्हणून काम करीत असताना त्यांना ताराबाई मोडक भेटल्या आणि त्यांनी ताराबाईंच्या बोर्डी (ठाणे) येथे आदिवासींसाठी असलेल्या ग्राम बाल शिक्षण केंद्रात प्रवेश केला व तेथे इ.स. १९४७ ते १९९२ अशी ४७ वर्षे त्यांनी निरपेक्ष वृत्तीने ग्रामशिक्षणाचे कार्य चालवले. पुढे कोसबाडच्या नूतन बाल शिक्षण केंद्राच्या चालक, राष्ट्रीय शिक्षण अनुसंधान व प्रशिक्षण मंडळाच्या कार्यकरिणी सदस्य, अखिल भारतीय पूर्व प्राथमिक शिक्षण संस्थेच्या उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. त्यांचे शिक्षणविषयक ग्रंथ इंग्रजी, हिंदी, गुजराथीतून अनुवादित झालेत. प्रबोधनासाठी वाहिलेल्या शिक्षणपत्रिका व स्त्रीजागृतीसाठी असलेल्या 'सावित्री' मासिकाच्या त्या संपादिका होत्या. कोसबाडच्या टेकडीवर आदिवासींच्या उन्नतीसाठी एक संस्था स्थापन केली. या संस्थेलाच 'कोसबाड प्रकल्प' म्हणून ओळखले जाते. आदिवासींच्या शिक्षणासाठी पाळणाघरे, बालवाड्या, प्राथमिक शाळा, प्रौढ शिक्षण वर्ग, बालसेविका ट्रेनिंग कॉलेज इ. शैक्षणिक संस्था सुरू केल्या.

अनुताई वाघ यांनी सुरुवातीला बोर्डी आणि नंतर कोसबाडच्या टेकडीवर जे-जे शैक्षणिक व सामाजिक उपक्रम केले त्या सर्वांचा एक स्वतंत्र अभ्यास व्हावा नव्हे तर तो आपण करावा इतके ते महत्वाचे आहेत. अनुताईंनी जेव्हा पाड्यावरच्या अनेक मुलांना कोसबाडच्या बालवाडीत आणण्याचा घाट घातला तेव्हा सामाजिक मानसिकतेवर देखील काम करण्याची गरज होती. पाड्यावरच्या लहान मुलांना शिकवण्याआधी त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याआधी त्यांच्या आरोग्यासाठी पावलं उचलायला हवी हे लक्षात घेऊन अनुताईंनी पाड्याच्या सर्व मुलांना कोसबाडच्या टेकडीवर आल्या-आल्या अंघोळी घालण्याचा कार्यक्रम सुरू केला होता त्यामागचं कारण हे कितीही आरोग्याला धरून असलं तरी त्याचा परिणाम मात्र असा झाला की सकाळच्या ज्या वेळामध्ये अनुताई वाघ पाड्यावरच्या मुलांना घेऊन येत असायच्या त्या वेळेत आदिवासी पाड्यावरची लोकं आपल्या मुलांना घेऊन जागोजागी उभी राहू लागली.आरोग्य विषयक एक जागरूकता लोकांमध्ये निर्माण व्हावी, स्वच्छतेचे महत्व कळावं म्हणून सुरू केलेला हा प्रयत्न नंतर अनुताईंची जबाबदारी होऊन गेला, अनुताईंचच काम आहे आणि अनुताई

येऊन आमच्या मुलांना अंघोळी घालतील असं म्हणत पाड्यावरच्या लोकांनी या कामासाठी अनुताईंचीच नेमणूक केली. अर्थात काही दिवस ही गोष्ट तशीच सुरु झाली पण कालांतराने अनुताईंनी लोकांना या गोष्टीची जाणीव करून दिली की, मी दाखवत असलेली वाट ही माझ्यासाठी नसून तुमच्यासाठी आहे आणि त्या वाटेवर चालण्याचे काम तुम्हालाच करावं लागणार आहे. असे अनेकविध अनुभव समृद्ध करणारे प्रसंग हे अनुताईंच्या संपूर्ण जीवनप्रवासाचा भाग आहेत.

कोसबाडच्या टेकडीवर आणू ताईंनी सुरू केलेले सर्वच प्रयोग हे केवळ सहज सुरू झालेले उपक्रम नसून खूप विचारपूर्वक, जाणीवपूर्वक त्यांची आखणी केली गेलेली दिसते. आदिवासी मुलं त्यांचं कौशल्य, त्यांच्या शारीरिक कौशल्याची पुरेपूर जाण असणाऱ्या अनुताई वाघ यांनी या मुलांना त्यांच्या हातांना काम मिळावं यासाठी सुतार काम, लेथ मशीन वरील काम, छपाईखाना, खेळणी बनविण्याचा कारखाना असे विविध कौशल्य आधारित उपक्रम सुरू केले, ज्यामुळे ही मुलं शिक्षणासोबतच व्यावसायिक क्षेत्रातही स्वतःसाठी काहीतरी करू शकतील पायावर उभे राहू शकतील हा त्या मागचा विचार होता. ज्या व्होकेशनल कोर्स विषयी तुम्ही आणि मी आता विचार करत आहोत, नव्या शैक्षणिक धोरणात त्याचा समावेश केला आहे ते सर्व अनुताईंच्या विचारात किती आधी केलेला दिसतो.

अनुताई ताराबाईंना कायमच आपल्या मार्गदर्शक गुरु, आधारवड म्हणून आदरस्थानी ठेवत. ताराबाईंनी एखादा कामाचं नियोजन करावे आणि ते काम अनुताईंनी तडीस न्याव इतकं उत्तम नातं त्या दोघींमध्येही असल्यामुळेच विकासवाडीचा प्रकल्प आणि त्याची ख्याती दूरवर म्हणजे अगदी युनिसेफ पर्यंत पोहोचू शकली. ताराबाई आणि अनुताईंनी कोसबाडच्या या टेकडीवर केलेले सर्वच प्रयोग हे अनेकांसाठी अभ्यासाचा विषय ठरले. अनुताईंबरोबर वेळ घालवलेल्या एका प्राध्यापकांकडून आम्हाला असं कळालं होतं की, अनुताईंचे शैक्षणिक नवे-नवे प्रयोग बघण्यासाठी, समजून घेण्यासाठी अनेक जण कोसबाडला येत असत एक दिवस जेव्हा आमचे हे प्राध्यापक अनुताईंना भेटण्यासाठी अनुताईंच्या आणि ताराबाईंच्या जिथे आता स्मृतीसदन आहे तिथे गेले तेव्हा अनुताईंच्या खुर्ची जवळ एक व्यक्ती मांडी घालून अनुताईंचे सर्व विचार शांतपणे ऐकत होती ती व्यक्ती दुसरी तिसरी कोणी नसून त्या वेळचे महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक वि.वि. चिपळूणकर असून ते अनुताईंकडे मार्गदर्शनासाठी आले होते. खरं बघायला गेलं तर एवढ्या मोठ्या पदावरची व्यक्ती आणि सरकारी प्रशासनातील व्यक्ती, त्याबाबतचा प्रोटोकॉल संबंधित असणाऱ्या इतर अनेक गोष्टी या सर्वांना फाटा देत अधिकारी डहाणू पासून कोसबाड पर्यंत एकटेच कोणत्याही पद्धतीचा लवाजमा स्वतः सोबत न घेता अतिशय साधेपणाने त्या कोसबाडच्या टेकडीवर आले तिथं ज़ानयज़ त्यांनी स्वतः बघितला आणि अनुताईंसारख्या शिक्षण ज्योती कडून प्रकाश घेत त्यांनी त्यांचा पुढचा प्रवास सुरू केला.

कोसबाडच्या टेकडीवरून या अनुताईंच्या पुस्तकातून आपल्याला अनेक गोष्टी कळत असल्या तरी त्या सर्व गोष्टी पुन्हा पुन्हा वाचून त्या गोष्टींमधला मुख्य अर्थ आणि गाभा शोधणे आणि त्यामागचं अनुताईंचं म्हणणं समजून घेणं हे खूप महत्त्वाचं आहे. अनुताईंनी आपल्या लिखाणात दाभोणच्या प्रकल्पाविषयी अनेक ठिकाणी लिहून ठेवले आहे.विकासवाडी इतकं यश दाभोण प्रकल्पाला आलं नाही, याविषयी असणारी अनेक कारणं तटस्थपणे मांडणाऱ्या अनुताई

आपल्याला एक वेगळाच आदर्श देऊन जातात. लोकमान्य, जगमान्य असा एक उत्तम यशस्वी प्रयोग एका ठिकाणी केल्यानंतर जेव्हा दुसऱ्या ठिकाणी अपयश येतं तेव्हा त्या अपयशाला अनेकदा लोक स्वीकाराला तयार होत नाहीत किंवा त्या अपयशांच्या कारणांपर्यंत पोहोचण्याचा मोठेपणा जात नाही पण अनुताईंनी मात्र दाभोणचा प्रकल्प त्यामध्ये आलेल्या अडचणी त्यासाठी खरंच करावे लागणारे प्रयत्न किंवा त्या प्रयत्नांमध्ये आलेले अडसर, चुकलेल्या गोष्टी या इतक्या प्रामाणिकपणे आणि सहजतेने मांडले आहेत की आपल्याला कळतं की आयुष्यामध्ये यशस्वी झाल्यानंतर सुद्धा जर कधी अपयश आलं तर त्या अपयशाला आपण किती समजून घ्यायला हवं अपयशाचा स्वीकार होण आणि नंतर त्यावर काम करणं हे यशाच्या उच्च शिखरावर असताना सुद्धा जर आपल्याला जमलं तरच आपण एक उत्तम व्यक्ती असू शकतो.

कोसबाडच्या टेकडीवर जसजशी लोकांची रेलचेल वाढू लागली तशी अनुताईंनी टेकडीवर अनेक महत्वपूर्ण आणि गरजेच्या सुधारणा घडवून आणल्या. त्यातली एक महत्वपूर्ण गोष्ट म्हणजे कोसबाडच्या टेकडीवर पाणी आलं. पाड्यावर असणाऱ्या साऱ्यांसाठीच हा नळ खुला असायचा. अनेकदा अनुताई जिथे पाण्याचा नळ आहे तिथे पाड्यावर येणाऱ्या महिलांशी बोलत बसलेल्या असायच्या. एकदा त्यांना एकाने प्रश्न विचारला की अनुताई रोज रोज या बायकांची तीच तीच गाऱ्हाणी ऐकून तुम्हाला कंटाळा कसा येत नाही. तर त्यावर अनुताईंनी दिलेलं उत्तर खूपच सुरेख आहे. अनुताई म्हणाल्या "पाडयावरच्या या बाया बापड्या त्यांच्याशी जो पर्यंत तुम्ही बोलणार नाही त्यांचे प्रश्न समजून घेणार नाही तोपर्यंत तुम्हाला या पाड्यावरच्या लोकांचे प्रश्न कळणार कसे? " हे वाक्य केवळ बोलण्यापुरते नसून अनुताईंनी याच महिलाशी साधलेल्या संवादातून त्यांना अनेक प्रश्न कळाले आणि ज्यावर उपाय शोधत अनुताईंनी इथल्या महिलांच्या हाताला काम मिळालं तर त्या काहीतरी करू शकतील अशा विचाराने पुढे कधीतरी भेटीला आलेल्या पाहुण्यांकडून मदत म्हणून शिलाई मशीन मागवून घेतल्या. महिलांच्या हाताला काम तर मिळालंच पण त्याच बरोबर एक आत्मविश्वास देखील त्या आदिवासी महिलांमध्ये पेरता आला.

असे एक ना अनेक प्रसंग जे अनुताईंच्या आयुष्याचा भाग झाले त्या प्रत्येक प्रसंगातून एक कर्तव्यदक्ष, विचारी नेतृत्व म्हणजे नक्की काय हे आपल्याला उमगत जात. आपल्याकडे चांगलं काम केल्यानंतर आयुष्यामध्ये सत्कार्य झाल्यावर मोक्ष प्राप्त होतो अशी काहीशी धारण आहे अनुताईंचे संपूर्ण चरित्र जेव्हा तुम्ही बघता तेव्हा त्यांच्या चरित्रातील प्रत्येक गोष्ट तुम्हाला एकच सांगते ती म्हणजे आपलं काम प्रामाणिकपणे आणि सातत्यानं करणं हाच खरा मोक्ष आहे. तुम्ही करत असलेलं काम त्यातून घडणारा बदल आणि त्यातून अनेकांना मिळणारी प्रेरणा हाच तुमच्या आयुष्याचा खरा मोक्ष आहे.

**सखोल दृष्टी : वैशाली जाधव : मानसिकतेवर काम व्हायला हवे!**

# मोक्ष हीच कोसबाडची टेकडी!

▶ मुंबई (वा.) 'कोसबाडच्या टेकडीवरून' या आत्मचरित्रातून अनुताई वाघ यांचे कार्य, समर्पण आणि त्यांच्या विचारांची सखोल दृष्टी मनात घर करते. कारण केवळ समाज सेवाभाव समोर न ठेवता 'मुले शाळेत येत नसतील तर त्यांच्या अंगणात शाळेचे झाड लावायला हवे' हे अनुताईंच तत्व अभ्यासता येते. शारदोत्सवानिमित्ताने महाविद्यालयात विद्यार्थिनींसमोर अनुताईंच्या कार्याचा आढावा घेतला जातो आहे, हे खरे स्त्रीशक्तीचे प्रतीक म्हणावे लागेल. 'मोक्ष शोधताना किंवा काम करताना कामातून मिळणारा मोक्ष हीच खरी कोसबाडची टेकडी!' अशी मोक्षाची व्याख्या करत एखादी नवीन गोष्ट घडविण्यासाठी त्याच गोष्टीवर काम न करता; तिच्या मानसिकतेवर निग्रहाच्या मदतीने काम करता यायला हवे.' असे प्रामाणिक मत मांडत निवेदिका वैशाली जाधव यांनी विद्यार्थिनींना संबोधित केले.



## नवविचार व्याख्यानमालेचे सहावे पुष्प

निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्या स्वायत्त महिला महाविद्यालयात मराठी विभागात शारदोत्सव २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवविचार व्याख्यानमालेचे सहावे पुष्प 'कोसबाडच्या टेकडीवरून' या विषयावर व्याख्यान आयोजनाचे. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय कला शाखेतील ज्योती पाटील, पायल गोतपगार ह्या विद्यार्थिनीने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठया संख्येने उपस्थित होते.

**दंतचिकित्सक - डॉ. रिबेका दोडती**

सुंदर हास्याचे खरे सौंदर्य दातांमध्ये असते. दात केवळ दिसण्यासाठीच नव्हे तर अन्न चावणे, पचनास मदत करणे, स्पष्ट बोलणे आणि आत्मविश्वास वाढवणे यासाठी अत्यंत महत्त्वाचे असतात. त्यामुळे दातांची रचना, त्यांचे आजार आणि योग्य काळजी जाणून घेणे गरजेचे आहे.

**दातांची ॲनाटमी (रचना) :** मानवी दात तीन मुख्य भागांपासून बनलेले असतात – इनॅमल, डेंटिन आणि पल्प. इनॅमल हा दाताचा बाहेरील, सर्वात कडक थर असतो. त्याखाली डेंटिन असते, जे दाताला आधार देते. पल्प हा आतला भाग असून त्यात नसा व रक्तवाहिन्या असतात. प्रौढ माणसाला साधारणपणे ३२ दात असतात – पुढचे कटर (Incisors), कॅनाइन, प्रीमोलर आणि मोलर, जे वेगवेगळ्या कामांसाठी उपयोगी पडतात.

**दातांचे वेगवेगळे आजार व त्यांचे उपचार :** दात किडणे (कॅव्हिटी) हा सर्वसामान्य आजार आहे. यासाठी फिलिंग किंवा गरज असल्यास रूट कॅनाल उपचार केला जातो. हिरड्यांचे आजार (जिंजिव्हायटिस, पेरिओडॉन्टायटिस) यामध्ये हिरड्या सुजणे, रक्त येणे अशी लक्षणे दिसतात. यावर नियमित स्केलिंग व योग्य औषधोपचार केले जातात. दात दुखणे, दात सैल होणे किंवा तोंडाला दुर्गंधी येणे याकडे दुर्लक्ष करू नये.

**दातांची काळजी :** दात निरोगी ठेवण्यासाठी दिवसातून दोनदा ब्रश करणे आवश्यक आहे. मऊ ब्रश आणि फ्लोराईडयुक्त टूथपेस्ट वापरावी. ब्रश करताना हलक्या हाताने गोलाकार हालचाली कराव्यात. रोज फ्लॉस वापरल्याने दातांमधील अन्नकण निघून जातात. माऊथवॉश वापरल्याने तोंडातील जंतू कमी होतात व श्वास ताजा राहतो.

**लहान मुलांचे दात :** लहान वयात दुधाचे दात जरी तात्पुरते असले तरी त्यांची काळजी घेणे खूप महत्त्वाचे आहे. गोड पदार्थ कमी देणे, झोपण्याआधी दूध पिल्यानंतर तोंड स्वच्छ करणे आणि लवकर दंततज्ज्ञांकडे तपासणी करणे आवश्यक आहे.

**दातांसाठी काय खावे व काय टाळावे :** दातांसाठी दूध, दही, चीज, हिरव्या पालेभाज्या, फळे, बदाम यांसारखे कॅल्शियमयुक्त व तंतुमय अन्न उपयुक्त ठरते. सफरचंद, गाजर यांसारखी कुरकुरीत फळे दात स्वच्छ ठेवण्यास मदत करतात. अतिगोड पदार्थ, चॉकलेट, कोल्ड ड्रिंक्स, चिकट मिठाया, सतत चहा-कॉफी पिणे दातांसाठी घातक ठरते. तसेच तंबाखू, गुटखा यांचा वापर दात व हिरड्यांचे गंभीर नुकसान करतो. योग्य आहार, नियमित स्वच्छता आणि वेळेवर दंततज्ज्ञांचा सल्ला घेतल्यास दात आयुष्यभर निरोगी व हास्य सुंदर राहू शकते.



## दातांपासून दातांकडे जाण्याचा प्रवास

**सातवी माळ**

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क 'दात आणि दातामुळे येणारे स्मित हास्य हा सौंदर्य खुलवणारा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे. दातांच्या समस्या वाढण्याचे प्रमुख कारण आहे आपली बदलेली खाद्यसंस्कृती. पूर्वी आपण जे खाद्य खात होतो त्यात फायबर किंवा तंतु पदार्थ होते उदा. भाकऱ्या खाणे किंवा भात हा कमी पॉलिश केलेला खात असे. आता सगळ्या पदार्थांमध्ये केमिकल्सचे प्रमाण अधिक वाढले आहे. पचनशक्ती कमी झाली आहे. त्यामुळे पित्त वाढते हेही एक कारण दात खराब होण्याचे आहे. जुन्या काळात अनेक दातावरून म्हणी प्रचलित झाल्या आहेत त्याही खऱ्या आहेत. हा दातापासून सुरू झालेला प्रवास दाताकडे येऊन संपतो. त्यामुळे दाताची निगा राखणे हे गरजेचे आहे, असे प्रतिपादन दंतचिकित्सक डॉ. रिबेका दोडती यांनी केले.

**व्याख्यानाचे केले आयोजन**

निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, मराठी विभागात शारदोत्सव २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवविचार व्याख्यानमालेतील सातव्या पुष्पात 'दातापासून दाताकडे' या व्याख्यानाचे. डॉ रिबेका दोडती या दंतचिकित्सक आहेत. त्याचबरोबर मराठीवर विशेष प्रेम असल्यामुळे सध्या त्या सेंट जोसेफ महाविद्यालय, सत्पाळा विरार येथे मराठी पदव्युत्तर पदवी शिक्षण घेत आहेत. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख डॉ. रश्मी शेटये तुपे यांनी केले. प्रमुख व्याख्यात्यांचे स्वागत प्रा. किरण जाधव तर सानिया काझी ह्या विद्यार्थिनीने आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"स्वयंसिद्धा" हा केवळ शब्द नाही, तर एक विचारप्रवाह आहे. स्वयंनिर्मिती म्हणजे स्वतःची ओळख, आत्मभान आणि क्षमतांचा विकास; तर स्वयंपूर्णता म्हणजे आर्थिक, सामाजिक, मानसिक आणि भावनिकदृष्ट्या सक्षम होणं. या प्रवासात स्त्री स्वतःच्या सामर्थ्यावर उभी राहते आणि कोणत्याही परिस्थितीत स्वतःचे निर्णय घेण्याची ताकद मिळवते हीच स्वयंसिद्धेची खरी ओळख. स्त्री सक्षमीकरण हा या विचाराचा केंद्रबिंदू आहे. शिक्षण, रोजगार, आरोग्य, कायदेशीर हक्क आणि सुरक्षितता या सर्व क्षेत्रांत स्त्री सक्षम झाली, तर समाजाची प्रगती अधिक सुदृढ होते. मात्र, वास्तवात अजूनही अनेक आव्हाने उभी आहेत. लैंगिक छळवणूक, अत्याचार, घरगुती हिंसा आणि असमान वागणूक यांसारख्या समस्या आजही दिसून येतात. अशा घटना, ज्या समाजाला हादरवून सोडतात, त्या आपल्याला केवळ दुःख देत नाहीत, तर बदलाची गरजही अधोरेखित करतात.

स्वयंसिद्धा ही संकल्पना याच ठिकाणी महत्त्वाची ठरते. ती स्त्रियांना केवळ संरक्षणाची अपेक्षा ठेवायला शिकवत नाही, तर स्वतः सक्षम होण्याची दिशा दाखवते. आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण, कायद्यांची माहिती, मानसिक बळ आणि आर्थिक स्वावलंबन या माध्यमांतून स्त्री अधिक जागरूक आणि निर्भय बनते. यासोबतच समाजाची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. मुलांना लहानपणापासूनच स्त्री-पुरुष समानतेचे संस्कार देणे, परस्पर सन्मानाची जाणीव निर्माण करणे आणि चुकीच्या वर्तनाविरुद्ध ठाम भूमिका घेणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये आणि सामाजिक संस्था यांनीही जनजागृती, समुपदेशन आणि सहाय्य केंद्रांच्या माध्यमातून या दिशेने काम करणे गरजेचे आहे.

स्वयंसिद्धा म्हणजे केवळ वैयक्तिक प्रगती नव्हे, तर सामूहिक परिवर्तनाची प्रक्रिया आहे. प्रत्येक स्त्री जेव्हा स्वतःला ओळखते, स्वतःवर विश्वास ठेवते आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवते, तेव्हा ती केवळ स्वतःसाठी नाही, तर संपूर्ण समाजासाठी एक नवी दिशा निर्माण करते. अशा प्रकारे "स्वयंसिद्धा" ही संकल्पना आपल्याला सांगते की भीतीपासून निर्भयतेकडे, अवलंबित्वापासून स्वावलंबनाकडे आणि अन्यायापासून न्यायाकडे वाटचाल करणं हीच खरी प्रगती आहे. या वाटचालीतील काही अनुभव मी आपणां सोर मांडते.

एक छोटीशी पार्टी : रजईच्या ऑर्डरची पोती भरून टेम्पो डिसपॅच केला आणि हुश्श करत ऑफिस मध्ये खुर्चीवर टेकले तोच एक सखी धापा टाकत हातात सामोसे घेऊन आली ,"ताई ही माझ्यातर्फे पार्टी" अग कसली ? माझा प्रश्न... डोळ्यात पाणीच आले तिच्या, ताई ह्या कठीण काळात नवऱ्याच्या हाताला काम नसताना रजई शिलाईतून घर चालवू शकले.आज पूर्ण पैसे मिळाले म्हणून नवीन वर्षाची सुरवात माझ्या मिळकतीतून करूया...किती आनंद ,उत्साह, स्वाभिमान होता त्या बोलण्यात💕

एक अनोखे समाधान मनावर अलगद पसरले गेले तीन महिने कोविडशी सामना करत या मंडळांनी ५ हजार रजया पूर्ण करण्यासाठी जी धडपड केली ती डोळ्यासमोर अली.अश्या ३० सख्या... प्रत्येकीची कथा वेगळी मनाला भिडणारी

एकदा संस्थेच्या वृद्धाश्रमात एक आजोबा सिरीयस होते म्हणून सकाळी सहा वाजता गेले तर खाली उद्योग केंद्रात लाईट दिसला,डोकावले तर माझी सखी मानेला पट्टा लावून राजाईचे तीन थर नीट लावत होती,घरी पुरेशी जागा नसल्याने उद्योग केंद्राचे इतर काम चालू व्हायच्या आत जोडणी करायला अली होती.पतीला नुकतेच गमावले होते,दोन शिक्षण घेणारी लेकरं पदरात, त्यात कोविडचे संकट... हाताला काम होते ते अगदी मनापासून करायची धडपड 💕

एक सखी तब्बल चाळीस हजार इतकी शिलाई गाठीशी जोडून गेली तेंव्हा तिच्या शिलाईचा वेग बघून थक्क व्हायला झाले,अग आजारी पडशील अशा ने,तर म्हणाली "ताई नवऱ्याची स्कूल बस गेले १० महिने बंद आहे तो खूप मदत करतो ह्या कामात म्हणून शक्य झाले.

गोडा मसाला गरम मसाला,लोणची इत्यादी पदार्थ आपल्या महिला बनवितात अगदी ३ हजार किलोपर्यंत उत्पादन करतात. पोळीभाजी केंद्र चालवितात.

ह्या आणि अश्या धडपडीच्या कहाण्या आगळ्यावेगळ्या जिद्दीचे दर्शन देतात.

स्त्री शक्तीला सलाम 🙏🙏

अब ना रुकेंगे हम, ना थकेंगे हम, संघर्ष की राह पर बढ़ेंगे हम ।💕💕💕

ह्या अश्या अनेक महिलांच्या हाताला रोजगार देण्याचे ध्येय अहिल्या महिला मंडळ पेण ह्या आमच्या संस्थेने ठेवले आहे.गेली २८ वर्षे संस्था पेण रायगड परिसरात आरोग्य,शिक्षण,समाज स्वास्थ आणि महिला सक्षमीकरण ह्या चस्तुसूत्री वर आधारित दोन वृद्धाश्रम,आदिवासी मुलींचे वासतिगृह,प्राथमिक शाळा,उद्योग केंद्र इत्यादी उपक्रम राबवीत आहे. महिलांना आर्थिक,मानसिक आणि सामाजिक दृष्टया सक्षम करणे हे संस्थेचे ध्येय आहे.त्यासाठी प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या वेळेप्रमाणे रोजगार उपल करणे आणि त्याची विपणन व्यवस्था संस्था करते.ह्या सगळ्या उपक्रमातून १०० महिलांना वर्षभर रोजगार उपल होतो.

एक महिला सक्षम झाली की कुटुंब सक्षम होते आणि पर्यायाने समाज सक्षम होतो.हाच सक्षम समाज देशाला उज्वल भवितव्य देतो..



## स्वयंसिद्धेकडून स्वयंपूर्णतेकडे – शारदोत्सवातील आठवी माळ प्रेरणादायी

मुंबई गुरुदत्त वाकदेकर । स्त्रियांना आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण टप्पा ठरलेली अहिल्या महिला मंडळ संस्था ही पेणसारख्या निमशहरी ठिकाणी असून, गेली अनेक वर्षे महिला सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. आदिवासी मुलींना, गृहिणींना विविध प्रकारचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार मिळवून देणे हे संस्थेचे वैशिष्ट्य आहे. आज या मुली डॉक्टर, वकील बनून उच्चशिक्षणापर्यंत पोहोचल्या आहेत. स्वयंसिद्धा, स्वादभारती, संजीवनी वृद्धाश्रम, स्वानंद संस्कार वर्ग असे विविध उपक्रम अहिल्या महिला मंडळात उत्साहाने सुरू असून महिलांना आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्याही सक्षम करण्यासाठी हे उपक्रम खऱ्या अर्थाने महिलांच्या सक्षमीकरणाचा आधारस्तंभ ठरत आहेत.

या प्रसंगी विद्यार्थिनींशी संवाद साधताना अहिल्या महिला मंडळ संस्थेच्या अध्यक्षा अश्विनी गाडगीळ यांनी "नागरिकांनी आता स्व यं नि र्मि ती पा सू न स्वयंपूर्णतेकडे धाव घेतली पाहिजे" असे प्रांजळ मत व्यक्त केले.

या पार्श्वभूमीवर सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालक श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवविचार – बहुआयामी स्त्री व्याख्यानमालेतील आठवे पुष्प "स्वयंसिद्धा" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृतीय वर्ष कला शाखेतील कोमल धोत्रे हिने केले, परिचय

पान ०२ वर...

### स्वयंसिद्धेकडून स्वयंपूर्णतेकडे - शारदोत्सवातील आठवी माळ

पूजा पवार हिने करून दिला तर आभार प्रदर्शन मानसी कदम हिने केले. या कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. संपूर्ण कार्यक्रम आभासी पद्धतीने पार पडला, त्यामुळे दूरदूरच्या विद्यार्थिनी व उपस्थितांना सहभागाची संधी मिळाली.

**सहाय्यक पोलीस निरीक्षक – गौरी जगताप**

स्त्री सुरक्षा आणि सायबर क्राईम हा आजच्या डिजिटल युगातील अत्यंत महत्त्वाचा आणि चिंतेचा विषय आहे. तंत्रज्ञानाच्या झपाट्याने झालेल्या विकासामुळे मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर आणि वेगवान झाले आहे; परंतु याच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून गुन्हेगारीही नव्या स्वरूपात वाढत आहे. विशेषतः स्त्रिया या सायबर गुन्ह्यांचे मोठ्या प्रमाणावर बळी ठरत आहेत. त्यामुळे स्त्री सुरक्षा आणि सायबर क्राईम या विषयावर सखोल विचारमंथन करणे अत्यंत आवश्यक आहे.

आजच्या काळात स्त्रिया शिक्षण, उद्योग, राजकारण, विज्ञान, क्रीडा अशा सर्वच क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे पुढे येत आहेत. त्या आत्मनिर्भर आणि सक्षम होत असल्या तरी त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न अजूनही गंभीर आहे. पूर्वी स्त्रियांना केवळ घराबाहेरील धोके अधिक होते; मात्र आता डिजिटल जगातही त्यांना अनेक प्रकारच्या संकटांना सामोरे जावे लागते. सोशल मीडिया, ऑनलाइन प्लॅटफॉर्म, मोबाईल ॲप्स यांचा वापर वाढल्यामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

सायबर क्राईमचे स्वरूप अत्यंत व्यापक आहे. यामध्ये बनावट ओळख (फेक प्रोफाइल) तयार करून फसवणूक करणे, वैयक्तिक माहिती चोरणे (हॅकिंग), फोटो किंवा व्हिडिओ एडिट करून बदनामी करणे, ऑनलाइन स्टॉकिंग (सतत पाठलाग करणे), धमक्या देणे, ब्लॅकमेलिंग, आर्थिक फसवणूक इत्यादी प्रकारांचा समावेश होतो. अनेक वेळा महिलांचे फोटो किंवा व्हिडिओ त्यांच्या परवानगीशिवाय शेअर केले जातात, ज्यामुळे त्यांच्या प्रतिष्ठेला आणि मानसिक आरोग्याला मोठा धक्का बसतो.

सायबर गुन्ह्यांची एक मोठी अडचण म्हणजे हे गुन्हे अनेकदा अदृश्य आणि गुप्त स्वरूपात घडतात. गुन्हेगार बनावट नाव, खोटे प्रोफाइल आणि तांत्रिक साधनांचा वापर करून स्वतःची ओळख लपवतात. त्यामुळे त्यांना पकडणे कठीण होते. तसेच अनेक महिलांना समाजाच्या भीतीमुळे किंवा बदनामीच्या भीतीमुळे तक्रार करण्यास संकोच वाटतो. हीच गोष्ट गुन्हेगारांसाठी पोषक ठरते.

या समस्येवर मात करण्यासाठी सर्वप्रथम जागरूकता आणि शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. महिलांनी सायबर सुरक्षिततेचे मूलभूत नियम पाळणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ, मजबूत पासवर्ड वापरणे, OTP किंवा वैयक्तिक माहिती कोणालाही न देणे, अनोळखी लिंकवर क्लिक न करणे, सोशल मीडियावर गोपनीयता सेटिंग्ज योग्य ठेवणे इत्यादी उपाय अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर, संशयास्पद व्यक्ती किंवा घटनेची त्वरित नोंद करणेही आवश्यक आहे.सरकारनेही या संदर्भात विविध कायदे आणि उपाययोजना राबविल्या आहेत. सायबर क्राईमविरोधी कायदे अधिक कडक करण्यात आले आहेत आणि सायबर सेलच्या माध्यमातून गुन्हेगारांवर कारवाई केली जाते. पोलिस प्रशासन अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम होत आहे. शाळा आणि महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा आणि नैतिकतेबद्दल शिक्षण देणे गरजेचे आहे. पालकांनीही आपल्या मुलांशी मोकळा संवाद ठेवून त्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.

स्त्री सुरक्षेसाठी समाजाची मानसिकताही बदलणे तितकेच गरजेचे आहे. स्त्रियांकडे आदराने पाहणे, त्यांना समान वागणूक देणे आणि त्यांच्या स्वातंत्र्याचा सन्मान करणे या गोष्टींची जाणीव प्रत्येकामध्ये निर्माण झाली पाहिजे. केवळ कायदे करून ही समस्या सुटणार नाही, तर समाजानेही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे.

आपत्कालीन परिस्थितीत किंवा मदतीची गरज भासल्यास खालील हेल्पलाइन क्रमांक अत्यंत उपयुक्त ठरू शकतात–

महिला हेल्पलाइन : १०९१
आपत्कालीन सेवा (पोलीस/अॅम्ब्युलन्स/फायर) : ११२
सायबर क्राईम हेल्पलाइन : १९३०
महिला सशक्तीकरण हेल्पलाइन : १८१
बाल मदत हेल्पलाइन : १०९८

याशिवाय, सायबर गुन्ह्यांची तक्रार ऑनलाइन राष्ट्रीय सायबर क्राईम पोर्टलवर करता येते, ज्यामुळे तक्रार नोंदवणे अधिक सोपे आणि सुरक्षित झाले आहे.

शेवटी, स्त्री सुरक्षा आणि सायबर क्राईम या समस्या एकमेकांशी घट्ट जोडलेल्या आहेत. सुरक्षित स्त्री म्हणजे सुरक्षित समाज. त्यामुळे प्रत्येकाने सजग राहून, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून, आणि एकमेकांना सहकार्य करून या समस्येवर मात करणे आवश्यक आहे. स्त्रीला सुरक्षित आणि सन्मानजनक वातावरण दिल्यासच समाज खऱ्या अर्थाने प्रगत आणि सशक्त होईल.


दैनिक जनसामान्यांचा आवाज RNI No. MAHMAR/2017/49039
गुहागर सत्ता
संपादक : राजेंद्र मांडवकर

शारदोत्सवातील नववे पुष्प : महिला सुरक्षेसाठी सायबर धडे




मुंबई (गुरुदत्त वाकदेकर) :

"डिजिटल युगात जग जवळ आले असले तरी महिलांसाठी ऑनलाईन सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये महिलांना लक्ष्य केल्या जाण्याच्या घटनांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. सोशल मीडियावर फोटो मॉर्फिंग, फसवणूक, ब्लॅकमेलिंग, खोट्या ओळखी तयार करणे आणि खाजगी माहिती लीक करणे यासारख्या गुन्ह्यांमुळे महिला मानसिक त्रासाला आणि सामाजिक अपमानाला सामोऱ्या जात आहेत. एआयचे विश्व जितके संधी देते, तितकेच ते धोका ही निर्माण करू शकते. महिलांनी आत्मविश्वासासह आणि जागरूकतेने डिजिटल जगाचा वापर केल्यासच खऱ्या अर्थाने सुरक्षितता साधता येईल," असे मत इंटरपोल गुन्हे शाखा मुंबई येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक गौरी जगताप-पाटील यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधताना व्यक्त केले.

निमित्त होते सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, मराठी विभाग आयोजित शारदोत्सव २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवविचार – बहुआयामी स्त्री या व्याख्यानमालेचे नववे पुष्प "महिला सुरक्षा आणि सायबर क्राईम" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन.

शारदोत्सव २०२५ या सलग नऊ दिवस चालणाऱ्या व्याख्यानमालेस महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सुरुवात सह. प्रा. माधवी पवार यांच्या स्वागतपर मनोगताने झाली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रियांका पालशेतकर हिने केले तर आभार प्रदर्शन मराठी विभाग प्रमुख डॉ. रश्मी शेटये-तुपे यांनी केले. सदर कार्यक्रमाला महाविद्यालयाचे माननीय प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.




## १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२६

## उद्धघाटक – शिल्पा कुलकर्णी, केंटकी अमेरिका









गौरवोद्‌गार ● मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे झाले उद्‌घाट

# ...तरी मन भरून येते : कुलकर्णी


▶ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. श्रीमती मणीबेन एम. पी. शाह स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंग्याच्या मराठी विभाग आयोजित मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचे उद्‌घाटन केंटकी अमेरिकास्थित सुप्रसिद्ध साहित्यिका शिल्पा कुलकर्णी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे अमेरिकेतून केले. याप्रसंगी बोलताना त्या म्हणाल्या, आम्हाला अमेरिकेमध्ये मराठी शब्द कानावर पडले की आमचे मन भरून येते. अंगामध्ये चार हत्तीचे बळ येते. मराठी शब्द कुठून आले? कोण बोलले? लगेच आमचे अधीर मन त्याचा शोध घेऊ लागते, मग आमचा संवाद मराठीत सुरू होतो. असे सांगून त्यांनी महाराष्ट्रात मराठी भाषा संवर्धनाचे कार्य श्रीमती मणीबेन एम. पी. शाह स्वायत्त महिला महाविद्यालयाने हाती घेतले आहे, ते खरोखरीच वाखाणण्याजोगे आहे, असे गौरवोद्गार काढले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.अर्चना पत्की यांनी मराठी विभागाचे तोंड भरून कौतुक करताना, मराठी भाषेविषयीचे गौरवोद्गार काढून भाषा टिकवणे तुमच्या आमच्या हातात आहे, असे प्रतिपादन केले.

## कार्यक्रमाचे आभासी पद्धतीने आयोजन

मराठी विभागातील सहाय्यक प्रा. माधवी पवार ... सुस्वर आवाजात मातृभूमी आणि मातृभाषेचे ... करणारे गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचा... आणि आभारप्रदर्शन मराठी विभागप्रमुख डॉ. र... शेट्ये तुपे यांनी केले. महाविद्यालया... समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. रेखा शेलार, क... महाविद्यालयातील प्रा. प्रदीप पाटील हे मान... कार्यक्रमास आवर्जून उपस्थित होते. हा कार्य... आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आला हो... कार्यक्रमास मराठीप्रेमी विद्यार्थिनी मोठ्या सं... उपस्थित होत्या.


# १५ जानेवारी २०२६ - गझलनामा

**गझलकार – सिराज शिकलगार, सांगली**
**गझलकार – प्रतिभा विभुते, पुणे**
**गझलकार – विजय काकडे, बारामती**
**गझलकार – शशिकला बनकर, भोसरी पुणे**
**गझलकार – स्मिता गोरंटीवार, वणी, यवतमाळ**









# १६ जानेवारी २०२६ - कवितांचे सादरीकरण












# १७ जानेवारी २०२६ – मराठी वारसा संस्कृतकडून मराठीकडे

**प्रशिक्षक – कविता ठक्कर, संस्कृतभारती संस्था**








**संस्कृतीला ओळख ● आरजे जगदीश यांचे विशेष कार्यक्रमात प्रतिपादन**

# रेडिओने दिला मराठी शब्दांना आवाज

मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. रेडिओच्या तरंगांवरून मराठी भाषा घराघरात पोहोचली. रेडिओने मराठी शब्दांना आवाज दिला आणि संस्कृतीला ओळख दिली. मराठी भाषेचा जिवंत श्वास आजही रेडिओतून ऐकू येतो आणि मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यात रेडिओचा सूर बुलंद होतो, असे गौरवोद्गार रेडिओ जॉकी जगदीश यांनी काढले.

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला व वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून 'रेडिओ हरवला आहे का?' या विषयावर विशेष रेडिओवरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## विशेष काव्यात्मक कार्यक्रमाचे सादरीकरण

या कार्यक्रमात रेडिओ पुणेरी आवाज १०७.८ एफ.एम.च्या माध्यमातून 'अलकची झलक' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाचे सादरीकरण आर. जे. जगदीश यांनी सायंकाळी ४ ते ५ या वेळेत केले. कार्यक्रमातून रेडिओचे बदलते स्वरूप, आजच्या डिजिटल युगातील त्याचे महत्त्व आणि मराठी भाषेच्या प्रसारातील रेडिओची भूमिका यावर आरजे जगदीश यांनी प्रकाश टाकला. यानंतर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत 'मुली रंगल्या काव्यात' हा विशेष काव्यात्मक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे सादरीकरण आर. जे. माधवी यांनी केले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या कवितांमधून मराठी भाषेची गोडी, संवेदनशीलता आणि सृजनशीलता प्रभावीपणे व्यक्त झाली.

## भाषेच्या जतन-संवर्धनासाठी रेडिओची महत्त्वाची भूमिका

- या कार्यक्रमाचे सायंकाळी ६ ते ७ या वेळेत समालोचन करण्यात आले. रेडिओ जॉकी जगदीश यांनी या समालोचनात कार्यक्रमाचे शैक्षणिक, भाषिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित करत मराठी भाषेचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रसारमाध्यम अर्थात रेडिओ आपल्या आयुष्यात किती अहम भूमिका बजावतो हे सांगून विद्यार्थिनींशी सुसंवाद साधला.
- कार्यक्रमाचे निवेदन मराठी विभागप्रमुख डॉ. रश्मी शेटये तुपे, तर आभारप्रदर्शन सहाय्यक प्रा. माधवी पवार यांनी केले. मराठी भाषा संवर्धनासाठी रेडिओसारख्या प्रभावी माध्यमाचा वापर करून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला विद्यार्थिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# १९ जानेवारी २०२६ - कथाकथन












# २० जानेवारी २०२६ – मराठी विनोदी किस्से












# २१ जानेवारी २०२६ - अभिवाचन











# २२ जानेवारी २०२६ - शब्दकोडे शब्दखेळ












# २३ जानेवारी २०२६ - लोकगीत सादरीकरण












# २४ जानेवारी २०२६ - तिळगुळ / हळदीकुंकू समारंभ











# २५ जानेवारी २०२६ – शब्द हसरे अर्थात हास्य कवितांचा सोहळा

**काव्य संमेलन अध्यक्ष – शैलजा करोडे, नेरूळ, नवी मुंबई,**
**कवयित्री – जयश्री चुरी, दादर, मुंबई,**
**कवयित्री – शशिकला बनकर, इंद्रायणी नगर, पुणे,**
**कवयित्री –शिल्पा सकळकळे, गुरुग्राम, हरियाणा,**
**कवयित्री – शेख वाय के, पारगाव दौंड, पुणे,**
**कवयित्री –प्राची जाधव, छत्रपती संभाजीनगर,**
**कवयित्री – श्रुती चौधरी, धाराशिव**






## 'शब्द हसरे' हास्य कवितांचा सोहळा संपन्न


▸ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा आणि ज्ञानदीप मंडळ संचालित सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय सत्पाळा,विरार (पश्चिम) यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विभागात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६ चे औचित्य साधून "शब्द हसरे" अर्थात हास्य कवितांचा सोहळा आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आला होता.


या काव्यसंमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवयित्री शैलजा कोरोडे (नवी मुंबई) या होत्या. १आपली मराठी अभिजात भाषा आपल्या सर्वांनाच वेगवेगळ्या साहित्यांतून जोपासता आणि वाढवता आली पाहिजे१ असे मत त्यांनी यावेळी नोंदविले. देशभरातील नामवंत कवी-कवयित्री या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या.

यामध्ये डॉ. शुभम पाटील (पालघर), जयश्री चुरी (दादर, मुंबई), शशिकला ...

अनुभवी कवी कवयित्रींनी सहभाग नोंदवित महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना हास्य कविता व विडंबन काव्यप्रकार यांचे ज्ञान व्हावे हा उद्देश डोळ्यांसमोर ठेवून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

हास्य, शब्दवैभव आणि मराठी भाषेचा आनंद लुटण्यासाठी अनेक महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी, पालकांनी, रसिकांनी,विद्यार्थीनी व इतर श्रोतुवर्गाने मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित दर्शवली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हे सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. जगदीश संसारे यांनी केले तर ...




मराठी विभाग
आयोजित
मराठी भाषा






Check In
Mumbai, Maharasht
107, R.a. Kidwai Marg, Matunga
Maharashtra 400019, India
Lat 19.027913° Long 72.86022
26/01/26 10:20 AM GMT +05:3
Google

# २७ जानेवारी २०२६ – पथनाट्य कार्यशाळा

## प्रशिक्षक – सहा. प्रा. जगदीश संसारे











# २७ जानेवारी २०२६ – पथनाट्य कार्यशाळा

**प्रशिक्षक – सहा. प्रा. जगदीश संसारे**

गुहागर सत्ता

मंगळवार दि. ०३ फेब्रुवारी २०२६

२

## रेडिओतून जिवंत राहते मराठी भाषा; 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा 2026'चा उत्साही आरंभ

**मुंबई (गुरुदत्त वाक्देकर) :**
रेडिओच्या तरंगांवरून मराठी भाषा घराघरात पोहोचली, शब्दांना आवाज मिळाला आणि संस्कृतीला ओळख मिळाली, असे प्रतिपादन आर. जे. जगदीश यांनी केले. सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला व वाणिज्य महिला स्वायत्त महाविद्यालयाच्या मराठी विभागच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा २०२६' अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याचाच एक भाग म्हणून 'रेडिओ हरवला आहे का?' या विषयावर विशेष रेडिओवरील कार्यक्रम दि. १८ जानेवारी २०२६ रोजी पार पडला.

सदर कार्यक्रम रेडिओ पुणेरी आवाज १०७.८ एफ.एम च्या माध्यमातून 'अलकची झलक' या कार्यक्रमाद्वारे सादर करण्यात आला. या सत्राचे मार्गदर्शन आर. जे. जगदीश यांनी सायंकाळी ४ ते ५ या वेळेत केले. कार्यक्रमात रेडिओचे बदलते स्वरूप, आजच्या डिजिटल युगातील त्याचे महत्त्व आणि मराठी भाषेच्या प्रसारातील रेडिओची भूमिका यावर प्रकाश टाकण्यात आला.



सहभागींना रेडिओच्या माध्यमातून भाषिक आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले गेले.

यानंतर सायंकाळी ५ ते ६ या वेळेत 'मुली रंगल्या काव्यात' हा विशेष काव्यात्मक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाचे सादरीकरण आर. जे. माधवी यांनी केले. विद्यार्थिनींनी सादर केलेल्या कवितांमधून मराठी भाषेची गोडी, संवेदनशीलता आणि सृजनशीलता प्रभावीपणे मांडली गेली, ज्यामुळे उपस्थित प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

रविवार, दि. १८ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या या कार्यक्रमाचे समालोचन सायंकाळी ६ ते ७ या वेळेत आर. जे. जगदीश यांनी केले. त्यांनी कार्यक्रमाचे शैक्षणिक, भाषिक आणि सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित केले व विद्यार्थिनींशी सुसंवाद साधत रेडिओच्या माध्यमातून मराठी भाषेचे संवर्धन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले.

सदर उपक्रमाचे निवेदन मराठी विभागप्रमुख डॉ. रश्मी शेट्ये तुपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सहाय्यक प्रा. माधवी पवार यांनी केले. मराठी भाषा संवर्धनासाठी रेडिओसारख्या प्रभावी माध्यमाचा उपयोग करून आयोजित केलेल्या या उपक्रमाला विद्यार्थिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, ज्यामुळे कार्यक्रम यशस्वी व प्रेरणादायी ठरला.

## पथनाट्याद्वारे सामाजिक प्रबोधन; महाविद्यालयातील कार्यशाळेत विद्यार्थिनींचे कौशल्य प्रदर्शन

**मुंबई (गुरुदत्त वाक्देकर) :**
श्रीमती मणिबेन एम. पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, माटुंगा येथे मराठी विभागाच्यावतीने १४ जानेवारी २०२६ पासून मराठी भाषा संवर्धन पंधरवड्या निमित्ताने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले होते. या पंधरवड्याच्या अंतर्गत मंगळवार, दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी विद्यार्थिनींना पथनाट्याची ओळख व्हावी या उद्देशाने प्राध्यापक जगदीश संसारे यांच्या मार्गदर्शनाखाली पथनाट्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

कार्यशाळेत महाविद्यालयाच्या कला शाखा प्रमुख डॉ. सरिता कासरळकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करत सांगितले,



"पथनाट्य हे समाजप्रबोधनाचे अत्यंत प्रभावी माध्यम आहे. विद्यार्थिनींनी या माध्यमाचा अधिकाधिक उपयोग करून समाजापर्यंत विविध संदेश पोहोचविला पाहिजे." त्या पुढे म्हणाल्या, "पथनाट्याद्वारे कमीतकमी शब्दात अधिकाधिक संदेश जनमानसापर्यंत पोहोचविता येतात; त्याची परिणामकारकता इतर कोणत्याही माध्यमापेक्षा अधिक आहे." त्यांनी मराठी विभागाचे तोंडभरून कौतुक केले आणि अशा प्रकारच्या कार्यशाळा सतत आयोजित करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्राध्यापक जगदीश संसारे यांनी विद्यार्थिनींना विविध खेळ व सराव सत्राद्वारे पथनाट्य कसे बसवायचे, विविध भूमिका कशा साकाराव्यात याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यशाळेत पथनाट्य प्रेमी विद्यार्थिनींनी प्रत्यक्ष सहभाग घेत विविध भूमिका साकारल्या, ज्यामुळे कार्यक्रम अधिक प्रभावी व उत्साही ठरला. दोन तासांच्या कार्यशाळेत विद्यार्थिनींनी आपले कौशल्य प्रदर्शन करून सर्व प्राध्यापकांची वाहवा मिळविली.

सदर कार्यशाळेचे आयोजन मराठी विभागप्रमुख डॉ. रश्मी शेट्ये तुपे यांनी केले, तर सहाय्यक प्राध्यापिका स्नेहा अडसूळ, ऋतुजा ढवळे आणि माधवी पवार यांनी मार्गदर्शनपर कार्यशाळेत सहाय्यक प्रशिक्षक म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. समाजशास्त्र विभागाचे सहा. प्रा. हेतल कोरलेकर यांनीही संपूर्ण वेळ उपस्थित राहून विविध उपक्रमांमध्ये सहभाग नोंदविला. बॅचलर ऑफ अकाउंटिंग एन्ड फायनान्स विभागाचे समन्वयक सहा. प्रा. दत्तात्रय गावडे यांनी विद्यार्थिनींना थोडक्यात मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थिनी सहभागी झाल्या. या उपक्रमामुळे पथनाट्याद्वारे सामाजिक संदेश पोहचविण्याची क्षमता विद्यार्थिनींमध्ये वृद्धिंगत झाली असून, मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याचा उद्देश विद्यार्थिनींपर्यंत प्रभावीपणे पोहोचल्याचे दिसून आले.

SEVA MANDAL EDUCATION SOCIETY'S
SMT. MANIBEN M.P. SHAH WOMEN'S COLLEGE OF ARTS & COMMERCE (AUTONOMOUS)
NAAC RE-ACCREDITED 'B++' GRADE WITH CGPA 2.88/4
UGC Honor : College with Potential for Excellence

**मराठी विभाग प्रकाशित ई-नियतकालिक**

# पालवी

## नव चैतन्य

# धन्यवाद

मराठी विभाग, श्रीमती. परमेश्वरी देवी गोरधनदास गरोडिया शैक्षणिक संकुल,
३३८, आर ए किडवाई रोड, माटुंगा (पू), मुंबई ४०००१९

द्वारे प्रकाशित, सर्व कॉपीराइटसह @२०२६